# माणूस

शनिवार । २८ जानेवारी १९७८ । ७५ पैसे

फुटीर वृत्तीचे प्रादेशिक पक्ष....

ठिकऱ्या उडालेला काँग्रेस पक्ष....

आपल्या अस्तित्वाची चुणूक दाखविणारे डावे कम्युनिस्ट....

आणि स्वतःच्या कर्तृत्वापेक्षा इतरांच्या फाटाफुटीमुळेच

प्रबळ होत असलेला जनता पक्ष....

□ □

निवडणूक आघाडीवर आजचे धावते चित्र असे आहे....

□ □

मतदार मात्र पूर्ण गांगरून गेला आहे....

( पृष्ठ : २-३ )

---

## यापुढील निवडणूक विशेषांक
## शेतकरी-कामगार पक्ष विशेषांक

## साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे-अंक पस्तीस

२८ जानेवारी १९७८

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
□
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये
□
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
□
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
□
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी : ४३४५९
□

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## □ निवडणूका ! निवडणूका!! निवडणूका !!!

कोणताही राजकीय पक्ष असो, सध्या परवलीचा शब्द झाला आहे–निवडणूका. वृत्तपत्रातून निवडणूक–वार्तापत्रांचा पूर वाहू लागला आहे. फाटाफुटीच्या संदर्भात व्यक्ती जेवढी महत्त्वाची तेवढे वृत्त मोठे आणि त्यावरील चर्चा सविस्तर, असा परिपाठ पडून गेला आहे. कारण रोज फाटाफुटीच्या वार्ता येऊन थडकत आहेत. कॉंग्रेस पक्ष, मग तो कोणाचाही असो, या फाटाफुटीच्या वार्तांनी पुरता त्रस्त होऊन गेला आहे. आज आपल्याबरोबर असलेला माणूस उद्या आपल्याबरोबर राहील की नाही, याची कॉंग्रेसमधील कोणत्याही गटाला शाश्वती वाटेनाशी झाली आहे. यातच बाळासाहेब देसाई यांच्या पक्षबदलाची बातमी. सारे स्थिरस्थावर झाले असे वाटत असताना बाळासाहेब आपल्याला दगा देतील असे काही कॉंग्रेस-वाल्यांना वाटले नव्हते; पण बाळासाहेब हलले आणि आपल्या पक्ष-त्यागाला झळाळी यावी म्हणून महिना–पंधरा दिवस जी खुर्ची मिरवता आली असती ती खुर्ची आणि तेवढ्याच मुदतीची आमदारकी त्यांनी राजी खुशी सोडून दिली. आता आवई उठली आहे की साहेबांचा पश्चिम महाराष्ट्रातला एक जबर चेला बगलेत मावतील एवढे आमदार घेऊन पक्ष सोडणार आहे. कोण राहणार आणि कोण जाणार याचा काही पत्ता लागणेच कठीण होऊन बसले आहे. तिकीट वाटपाचे अधिकार ज्यांच्याकडे अशी पक्षातील दादामंडळीही एक-मेकांकडे संशयाने पाहू लागली आहेत. कॉंग्रेसच्या दृष्टीने काळ तर मोठा कठीण आला आहे.

राष्ट्रीय पातळीवर फाटाफूट होऊन चिरली गेलेली कॉंग्रेस पर-स्परांची कडवी वैरी बनलेली आहे. रेड्डी–चव्हाण कॉंग्रेस वेळ पडल्यास जनता पक्षाची धन करून इंदिरा गटाला आगामी निवड-णुकीत चेचून काढण्याचा प्रयत्न केल्याखेरीज राहणार नाही, तर चव्हाण महाराष्ट्रातून आणि ब्रह्मानंद आंध्रातून उचलले जावे यासाठी वाटेल ते करण्याची तयारी इंदिरा कॉंग्रेसने चालवली आहे. एकमेकाच्या जिवावर उठलेले हे कॉंग्रेसवाले जनता पक्षाचा रस्ता सुलभ करून देत आहेत. भारतीय राजकारणाची मूसच वेगळी. लोकसभा निवडणुकांच्या वेळी वाटले होते, ध्रुवीकरण होऊन सरळ द्विपक्षीय लोकशाही रुजण्याची वाट मोकळी होईल. जेपींच्या मनातही हाच विचार होता. जनता पक्षामध्ये बहुतेक प्रमुख पक्ष विलीन झाल्याने या प्रक्रियेला गती मिळेल असे वाटले होते; पण कसचे काय न् कसचे काय, विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या फेरीत प्रादेशिक पक्ष बलिष्ठ झाले. मद्रासेत अण्णा डी. एम्. के. आणि पंजाबात अकाली सत्तेवर आले. कलकत्ता डाव्या कम्युनिस्ट पक्षाने जिंकून

घेतले आणि आता येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या फेरीतही लोकसभेतील विरोधी पक्षाची म्हणजेच कांग्रेसची ताकद वाढण्याची शक्यता नाही. द्विपक्षीय लोकशाहीचे स्वप्न विरून जाऊन फुटीर वृत्तीचे प्रादेशिक पक्ष, ठिकऱ्या उडालेला कांग्रेस पक्ष, अस्तित्वाची चुणुक दाखवणारे डावे कम्युनिस्ट पक्ष आणि प्रबळ जनता पक्ष असे चित्र दिसते. विरोधी पक्षामधील फाटाफुटीचा पूर्वी कांग्रेसला फायदा मिळायचा. आता कांग्रेसच्या ऐवजी जनता पक्षाला त्याचा फायदा मिळेल. तीस वर्षे नांगर फिरवून कांग्रेसने देश खणून काढला. आता कांग्रेसची भरपूर डोकी असलेला जनता पक्ष 'नागरधारी' झाला आहे. फाटाफुटीच्या वार्ता काही फारशा सुखावह नसतात. सर्वसाधारण जनतेला तर या बातम्या चांगल्याच अस्वस्थ करून सोडतात. अर्थात स्वार्थी राजकारण्यांना त्याचे सोयर-सुतक नसते. फाटाफुटीचा एक सगळ्यात वाईट परिणाम असा होतो की, पक्षबदल करणारा कार्यकर्ता जेवढा मोठा तेवढे त्याला मिळणारे बक्षीस मोठे, असा एक विचित्र पायंडा पडून गेला आहे. केवळ पक्षबदल केल्याने अधिक लाभ होतो, हे लक्षात आल्याने अनेक मातब्बर कार्यकर्ते–नेते खुशाल पक्ष बदलतात. त्याचा फायदा तर होतोच, पण त्यांचा फायदा होत असतानाच निष्ठावंतांच्या गळ्याला नख लावले जाते. महाराष्ट्रातलेच एक उदाहरण देतो. कालपर्यंत कांग्रेसमध्ये असलेले आंबेगाव तालुक्याचे आमदार किसनराव बाणखेळे बदलत्या वाऱ्याची दिशा ओळखून जनता पक्षात दाखल झाले. स्थानिक पातळीवर कांग्रेसला एक दणका मिळाला खरा, परंतु जनता पक्षाचे जे कार्यकर्ते त्या भागात लोकसभा निवडणुकीपूर्वीपासून काम करत आहेत त्यांना किसनरावांनी चांगलाच दणका दिला. कारण हे जनता पक्षात आले तेच मुळी तिकिटाची खात्री करून घेऊन, पुढील पाच वर्षांचा प्रवास निर्वेध व्हावा अशा हेतूने केलेला हा पक्षबदल त्यांना लाभदायक असला तरी जनता पक्षाचे एक कार्यकर्ते आणि विधानसभा निवडणुकांचे एक इच्छुक उमेदवार नंदकुमार काळे यांना किसनरावांचा हा पक्षबदल चांगलाच त्रासदायक ठरणार आहे. किसनरावांचा हा पहिलाच पक्षबदल नाही. १९७२ साली ते अपक्ष होते. निवडून आल्यावर ते संघटना कांग्रेसमध्ये होते आणि पुढे सत्ताधारी कांग्रेसच्या कंपूत येऊन बसले. आता किसनरावांची स्वारी जनता पक्षात येऊन बसली आहे आणि जनता पक्ष ज्या वेगाने शंकरराव, बाळासाहेब किंवा हे असले छोटे–मोठे किसनराव स्वतःच्या पक्षात दाखल करून घेत आहे ते पाहिल्यावर या पक्षाचा स्वतःच्या ताकदीवर काही विश्वास आहे का नाही, याचीच शंका येऊ लागते.

### एस्. एम्. जोशींना कानपिचक्या

येणारी सारी मंडळी गोळा करण्याचे किंबहुना दुसऱ्या घरातील म्हातारी–कोतारी मंडळीही हात धरून बाहेर आणण्याचे धोरण एस्. एम्. राबवू पाहात आहेत आणि वर नैतिकतेच्या साजूक गप्पा करू पहात आहेत. हे अजब धोरण जनता पक्षाला हितावह ठरणारे नाही. मित्रपक्षांसाठी जागांची जी खिरापत एस् एम्. जोशी यांनी वाटली त्या विरुद्ध त्यांच्या सच्चा साथीदारांखेरीज इतरांनीही आवाज उठविलाच– इतकेच नव्हे तर निवडणुकांच्या निमित्ताने बंगलोरला बसलेल्या नेतेमंडळींकडूनही कानपिचक्या आल्या. लोकसभा मतदार संघामध्ये सर्वसाधारणपणे विधानसभेच्या पाच ते सहा जागा असतात. लोकसभा निवडणुकांचे वेळी शेकापने पाच जागा जिंकल्या. लोकसभेचे प्रमाण लावून जागा वाटप करा, असे कोणी म्हणणार नाही. पण लोकसभा मतदारसंघांचे प्रमाण पहाता ज्या शे. का. पक्षाला केवळ २५ ते ३० विधानसभा जागा देणे रास्त झाले असते त्या शे. का. प. ला फार तर ५०–६० जागांपर्यंत भागवता आले असते. किंवा ते तसे भागविणे हे तर राज्यपातळीवर जनता पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या एस्. एम्. यांचे कामच होते. पण शे. का. पक्ष दडपण टाकत गेला आणि एस्. एम्. आणि त्याची मंडळी दबत गेली. आणि एस्. एम्. त्यांच्या पदरात ८० जागांचे झुकते माप टाकून गेले. सावधगिरी जरूर असावी, पण स्वतःच्या ताकदीवरही काही विश्वास असावा. शे. का. प. ने ताणून आपल्याला हव्या तेवढ्या जागा ओढून घेतल्यावर इतर मित्रमंडळीही सरसावली. त्यांच्यासाठी आणखी ७० जागा सोडल्या. त्यात डावे कम्युनिस्ट, रिपब्लिकन पक्षाचे कांबळे आणि खोब्रागडे गट आणि महाराष्ट्र समाजवादी कांग्रेस असे सारे मित्रपक्ष सामावून घेतले. दिडशे जागांची अशी खिरापत केल्यावर ज्या जागा उरल्या त्या १३८ जागा आता जनता पक्ष लढविणार आहे. आता केंद्रीय नेतृत्वाने जनता पक्षाने किमान १४४ जागा लढवाव्या असा सुस्पष्ट आदेश दिल्याने पुन्हा थोडीफार अदलाबदल करावीच लागणार आहे.

कांग्रेस गवत ज्या वेगाने वाढते त्या वेगाने विविध कांग्रेस पक्ष निर्माण झाले आहेत. आणि हे सारेच्या सारे विधानसभा निवडणुकीत उतरत आहेत. महाराष्ट्रापुरते पहायचे झाले तर रेड्डी–चव्हाण यांची त्यातल्या त्यात बाळसेदार कांग्रेस, शंकरराव चव्हाण यांची महाराष्ट्र समाजवादी कांग्रेस, संघटना कांग्रेस पुन्हा उभी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या स. का. पाटलांची संघटना कांग्रेस, तिरपुडेंच्या नेतृत्वाखाली सगळ्या जागा लढविण्याची डरकाळी फोडणारी इंदिरा कांग्रेस अशी ही विविध पाकळ्यात विभागलेली कांग्रेस विधानसभा निवडणुकांमध्ये उतरत आहे. त्याखेरीज शे. का. प., डावे कम्युनिस्ट, निस्तेज झालेले उजवे कम्युनिस्ट, मुंबईत कोरड्या डरकाळ्या फोडणारी शिवसेना, असे छोटे मोठे पक्ष जनता पक्षाच्या पाठिंब्यावर अथवा स्वतंत्रपणे निवडणुका लढवित आहेत. मतदार मात्र पुरता गांगरून गेलेला दिसतो. प्रचाराचे नारळ फुटत असतानाच जर त्याचे डोके इतके भणभणून गेले आहे तर पुढे प्रचार टिपेला पोचल्यावर त्याची बिचाऱ्याची काय अवस्था होईल हे सांगणे खरोखरच कठीण आहे. आज तरी परिस्थिती अशी दिसते की, स्वतःच्या कर्तृत्वापेक्षा कांग्रेसमधील फाटाफुटीचा लाभ जनता पक्षाला अधिक होईल. □

## ज्योती बसू .... एक छोटी मुलाखत

राज्यांना अधिक स्वायत्तता मिळावी असा घोषा लावणारे जे मुख्यमंत्री आहेत त्यात प. बंगालचे ज्योती बसू आघाडीवर आहेत. केरळमधून परत कलकत्त्याकडे जात असताना त्यांनी जी धावती मुलाखत दिली त्या मध्येही त्यांनी राज्यांना अधिक स्वायत्तता मिळाली पाहिजे, या त्यांच्या मताचा हिरीरीने पुरस्कार केला. ते

म्हणाले– माझ्या सरकारचा केंद्राशी आजवर संघर्ष आला नाही हे खरे असले तरी सध्याची आपली शासनपद्धती जवळ-जवळ केंद्रशासित स्वरूपाची आहे. राज्यांना केंद्रावर कसे आणि किती अवलबून राहावे लागते याचे उदाहरण देताना ते म्हणाले– माझ्या सरकारने शेतमजुरांना संरक्षण देणारा एक कायदा विधान-सभेमध्ये मंजूर करून घेतला. तथापि त्याची अंमलबजावणी होण्या-साठी राष्ट्रपतींची संमती आवश्यक असते. तीन महिने होऊन गेले अजूनही मंजुरी येतेच आहे. माझ्या सरकारने वेळोवेळी स्मरणपत्रे लिहिली. या संदर्भात जो काही तपशील केंद्राने मागविला होता तो तपशिल पाठविण्यात आला. मी स्वत: महिन्याभरापूर्वी जाऊन– विचारणा करून आलो. परंतु अजूनही हे प्रकरण तसेच दिल्लीत पडून आहे. आता या संदर्भात आणखी काही खुलासे वगैरे मागविले असले तर मात्र मला कल्पना नाही. मला असे वाटते की, या संदर्भात राज्यांना आधिक अधिकार मिळणे अत्यंत आवश्यक आहे. आमची धोरणे राज्यस्तरावर आम्हाला राबवता आलीच पाहिजेत त्यासाठी केंद्राच्या औपचारिक मंजुरीची आवश्यकता नसावी.

कोणत्याही क्षेत्रामधील खाजगी एकाधिकाराबाबत आपण अनुकूल नसल्याचे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. ते म्हणाले– पण आमची अनुकुलता फारशी अर्थपूर्ण नसते. कारण या प्रश्ना-बाबतही अंतिम धोरण केंद्रसरकार ठरविते. आर्थिक धोरणांच्या बाबतीत राष्ट्रीय स्तरावर बदल होणे आवश्यक आहे, असे आपले मत असल्याचे त्यांनी सांगितले. उजव्या कम्युनिस्ट पक्षांबद्दल विचार-लेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले–या पक्षाने आपली चुकिची धोरणें बदलली तर त्याच्याबरोबर सहकार्य करणे शक्य आहे. केवळ अध्यक्ष डांगे हलले म्हणजे त्या पक्षाबरोबर आमची जवळीक होईल असे मानणे सर्वथैव चूक आहे. कारण आमचे डांगे यांच्याबरो-बर मतभेद नसून ज्या चुकीच्या वळणावर त्यांनी त्या पक्षाला नेऊन ठेवले त्याबद्दल आमचा त्यांच्यावर राग आहे. लोकांच्या– आणि आपल्याच पक्षाच्या अनुयायांच्या हिताचा विचार न करता केवळ चार दिवसाच्या फायद्यासाठी त्यांनी सारा पक्ष इंदिरा गांधीच्या दावणीला नेऊन बांधला. उजवे कम्युनिस्ट निश्चितपणे डाव्या विचारसरणीचे आहेत, असे सांगून बसू पुढे म्हणाले–परंतु त्यांचे सध्याचे धोरणही गोंधळात टाकणारे आहे. आता त्यांच्या पक्षामधील 'दुय्यम' स्तरावरील नेतेही अधिक मोकळेपणाने बोलू लागले आहेत. तथापि धोरणांची निश्चित दिशा कळण्यासाठी काही काळ थांबावे लागणार आहे. इंदिरा गांधी यांच्यापासून तो पक्ष आता बाजूला झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर ते म्हणाले–वास्तविक त्यांना इंदिरा गांधीबरोबर इतकी गट्टी करण्याचे काही कारणच नव्हते; पण समजा डांगे, यांच्या आग्रहाखातर ही गट्टी झाली असे मानले तर आता डांगे गेल्यावर तरी निदान त्यांनी कॉंग्रेसपासून बाजूला व्हावे की नाही; पण नाही आता त्यांनी रेड्डी-चव्हाण मंडळींबरोबर गट्टी जमविली आहे. मग आमचे त्यांचे कसे काय जमणार ? कॉंग्रेस-बद्दल त्यांच्या मनात असणारा सारा राग इंदिराजीबद्दल प्रश्न विचारला जाताच उफाळून आला. कॉंग्रेस फाटाफुटीच्या संदर्भात इंदिरा कॉंग्रेसला सहकार्य केल्याचे नाकारून ते म्हणाले, आमचे सरकार किंवा पक्ष कॉंग्रेसला कोणत्याच बाबतीत कधीच सहकार्य करणार नाही. कॉंग्रेसमधील फाटाफुटीबद्दल बोलताना ते म्हणाले, या पक्षाने देशाचे एवढे नुकसान केले आहे की, आता होत असलेल्या त्यांच्या विनाशाबद्दल खंत करण्याचे काहीही कारण नाही. सहज जाता जाता कोणी तरी संजय गांधीबद्दल विचारले तरी बसू चटकन म्हणाले, 'मला कशाला विचारता, काय विचारायचे ते आईसाहेबांनाच विचारा की !!' ◻

## ◻ भारताच्या सरसेनापतींबरोबर बातचीत

पंधरा ऑगस्ट आणि सव्वीस जानेवारीला राष्ट्रभक्तीपर गीते आकाशवाणीवर वाजू लागली की, नागरी पोशाख करणाराला जशी सैन्याची आठवण होते, त्याचप्रमाणे–वृत्तपत्रं वगैरेनाही नेमकी याच दिवसात सैन्याची आठवण होते. 'इंडिया–टूडे' या पाक्षिकाने आपल्या प्रजासत्ताक दिन अंकामध्ये जनरल रैना यांची एक मुलाखत प्रसिद्ध केली आहे. भारताच्या संरक्षण व्यवस्थेमध्ये भारताच्या सरसेनापतीचे विशेष महत्त्वपूर्ण स्थान असते. विमानदल, नौदल यापेक्षाही भूदलाचे स्थान आणि ज्येष्ठता यांना परंपरेप्रमाणे विशेष मान दिला जातो. संरक्षणावर खर्च होणाऱ्या वार्षिक–२,७५२ कोटीपैकी, भूदलावर १,२७९ कोटी रुपयांची रक्कम खर्च होते. भारतीय सेनादलामध्ये असलेल्या १०,९६००० लोकांपैकी ९,५०,००० एवढे लोक भूदलामध्ये काम करतात. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये पाच युद्धे आणि अनेक लहान-मोठ्या चकमकीमध्ये भाग घेणाऱ्या या सैन्याच्या सरसेनापतीपदाची सूत्रे जनरल रैना यांच्या हाती १ जून १९७५ पासून आहेत. जनरल रैना काश्मिरी. एप्रिल १९४२ मध्ये ते अधिकारी म्हणून भरती झाले. दुसऱ्या महायुद्धामध्ये त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला होता. १९६२ साली चीनबरोबर झालेल्या युद्धामध्ये त्यांनी जे धैर्य दाखविले आणि कठीण परिस्थितीमध्ये ज्या कौशल्याने सैन्याचे नेतृत्व केले त्यामुळे त्यांना महावीरचक्राचा बहुमान देण्यात आला. १९७१ ज्या भारत-पाक युद्धाचे वेळी त्यांनी बजाविलेल्या कामगिरीबद्दल त्यांना–पद्मभूषण किताब देण्यात आला. सैन्यामध्ये त्यांच्याबद्दल नितांत आदराची भावना आहे. सर्वसाधारण जवानाची ते आपुलकीने काळजी घेतात, त्यामुळे सेनादलामध्ये ते सैनिकाचे सैनिक म्हणून ओळखले जातात. १ जून १९७५ पासून सेनादलाची सूत्रे सांभाळणारे रैना येत्या ३१ मे १९७८ रोजी निवृत्त होणार आहेत. निवृत्तीनंतर काय करणार याबाबत प्रश्न विचारला असता–तेव्हा बघू, आताच काय घाई आहे असे म्हणून त्यांनी तो विषय सोडून दिला. रैना यांचे वडील पंजाब-मध्ये पोस्टमास्टर जनरल होते. जनरल रैनांना दोन मुले होती, एक मुलगा आणि एक मुलगी. (लाल त्रिकोण सरसेनापतीपर्यंत पोचला होता तर!!) यापैकी मुलगा ज्योतिश्वर वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून सैन्यात दाखल झाला. पिताजी त्याला जो म्हणून हाका मारीत असत. आपल्या आई-वडिलांचा तो अतिशय लाडका होता आणि सैन्यातही एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखला जात होता; परंतु पुत्र सुखाच्या बाबतीत रैना दांपत्य दुर्दैवी म्हणावे लागेल. ज्याच्याबद्दल पुष्कळ अपेक्षा होत्या असा त्यांचा हा कर्तृत्ववान मुलगा १९७४ च्या मार्चमध्ये एका मोटार अपघातामध्ये दगावला. त्यांची मुलगी विवाहित असून आपल्या घरी सुखासमाधानात आहे. स्वत: रैना–गोल्फ उत्तम खेळतात, त्याखेरीज त्यांना वाचनाचा छंद असून बागकामाची आवड आहे, तर असा हा बहुढंगी सेनानी. विचारल्या गेलेल्या प्रश्नांना त्यांनी मनमोकळेपणाने उत्तरे दिली आहेत.

**प्रश्न** : पाकिस्तानबरोबरील संघर्षानंतर भारतीय सैन्यदलामध्ये कोणते महत्त्वाचे बदल व सुधारणा झाल्या ?

**उत्तर** : भारतीय सैन्यदलाचा आत्मविश्वास या युद्धानंतर वाढला आहे. सेनादलाच्या आयुधांची चाचणी सतत होत असते आणि गरजेप्रमाणे त्यात सुधारणा करण्यात येऊन ती जास्तीत जास्त आधुनिक ठेवण्यात येतात.

**प्रश्न** : अंदाजपत्रकामध्ये संरक्षण खर्चात मोठी कपात केल्याचे दिसते, त्याचा सेनादलावर काय परिणाम झाला ? (पृष्ठ २४ वर)

परराष्ट्रीय घडामोडी

# इटलीतील यादवी

चंद्रशेखर पुरन्दरे

सोमवार दिनांक १६ जानेवारी १९७८ ला इटलीचा पतप्रधान ग्युएले आन्द्रेती याने आपल्या सरकारचा राजीनामा अध्यक्ष लिओन यांना सादर केला. हे कोसळलेलं सरकार फॅसिस्ट राजवट टळल्यापासूनचं एकोणचाळिसावं आणि आन्द्रेतीचं स्वत:चं तिसरं होतं. हे सरकार अठरा महिने टिकलं, हेही एक आश्चर्यच. तरीसुद्धा सत्ताकालाच्या दृष्टीने हे सहावं सरकार होतं. यावरून इटलीमध्ये राजकीय अस्थिरता किती पराकोटीची आहे, हे दिसून येईल.

हे सरकार कोसळणार याची पावलं ते पाळण्यात असतानाच दिसायला लागली होती. आन्द्रेतीचा पक्ष ख्रिश्चन डेमोक्रॅटिक. हा एकच पक्ष गेली तीस वर्षे सत्तेवर आहे. ऑगस्ट १९७६ मध्ये झालेल्या निवडणुकीत तो परत सत्तेवर आला. सगळ्यात जास्त मतं या पक्षाला पडली, पण तो निर्विवाद बहुमत मिळवू शकला नाही. कम्युनिस्टांची ताकद याच निवडणुकीत जगासमोर प्रथम आली. ख्रिश्चन डेमोक्रॅटस् आणि कम्युनिस्ट याचे हाडवैर जगजाहीर आहे. स्वत:च्या ताकदीवर तर उभं राहाता येत नाही आणि दुसऱ्या मोठ्या पक्षाची–कम्युनिस्टाची–तर कोणत्याही स्वरूपाची मदत घ्यायची नाही–असल्या आडमुठ्या धोरणामुळे ख्रिश्चन डेमोक्रॅटस् काय दिवे लावणार, हा प्रश्नच होता. ते दिवे विझलेच.

१९७७ च्या म्हणजे मागच्या वर्षीच्या उन्हाळ्यात या चमत्कारिक परिस्थितीवर एक अफलातून तोड काढण्यात आली. ती म्हणजे, कम्युनिस्ट आणि इतर तीन पक्षानी–त्याच्यात रिपब्लिकन आणि सोशॅलिस्ट महत्त्वाचे–अविश्वासाच्या ठरावावर मतदान करायचं नाही किंवा दुसऱ्या शब्दात, सरकार पडू द्यायचं नाही आणि पाचही पक्षांना मान्य असा तोडगा किंवा अशी पॉलिसी अमलात आणायची. कम्युनिस्टानी बेर्लिंगरच्या नेतृत्वाखाली यालाही मान्यता दिली. पण अल्पावधीतच रिपब्लिकन पक्षाने देशाच्या अन्तर्गत समस्या सोडविण्यास हे सरकार असमर्थ ठरल्याचं सांगून त्याच्या बरखास्तीची मागणी केली.

## इटलीची अंतर्गत परिस्थिती

अत्यंत वाईट परिस्थितीत असलेल्या युरोपीय देशांमध्ये इटलीची गणना केली जाते. अर्थव्यवस्था पूर्णतया कोसळलेली आहे. बेकारी आणि चलनवाढ आ वासून उभे आहेत आणि आता राजकीय हिंसा, देशाच्या स्थैर्यालाच धोका देईल इतकं भयानक रूप धारण करीत आहे. हा हिंसाचार इतका बोकाळला आहे की, त्यामुळे सामान्य माणसाचा सरकारच्या शासनक्षमतेवरचा विश्वासच उडू लागल्यास नवल नाही. डिसेंबर १९६९ मध्ये मिलानमध्ये राजकीय हिंसाचाराचा पहिला उद्रेक झाला. ह्यानंतर आजतागायत या प्रकाराला आळा नाही. रोम, मिलान आणि तुरीन ही प्रमुख केंद्रे. किंबहुना याच ठिकाणी सर्व उद्रेक होतात. त्यात सरळ ठार मारणे, पळवून खंडणीची मागणी करणे, रस्त्यावर मोटारी जाळणे इत्यादी गोष्टी अनुस्यूत. हिंसाचार करणाऱ्या दोन जहाल संघटना, एक अति उजवी म्हणवून घेते. तिच नाव Neo–Fascist Italian Social Movement, दुसरी अति डावी ती Extreme Left Red Brigade. या दोन संघटना एकमेकाच्या जीवावर तर उठल्याच आहेत, पण जो राजकीय पुढारी त्यांना त्यांच्या धोरणाविरुद्ध वाटेल त्याच्याही जीवाचा मक्ता त्यांनीच घतला आहे. आठवड्यापूर्वीच झालेले दोन प्रकार पाहिले तरी याची भीषणता लक्षात येईल. तुरीनमध्ये 'फियाट' कंपनीचा एक प्रमुख, गुस्ताव गिरितो याच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. ह्या अतिडाव्या संघटनेतर्फे होत्या; दुसरी घटना बेर्गमोमधील आहे. यात दीड लाख ते अडीच लाख वॉशिंग मशिन्स असणारं कपड्यांचं प्रचंड धुलाई-केन्द्र भस्मसात करण्यात झालं. याची दुसरी बाजू–अतिउजवी संघटना यानी एन्रिको बेर्लिंगर या उपरोल्लेखित कम्युनिस्ट नेत्याच्या हत्येचा विडा उचलला आहे. उजव्या संघटनेच्या तीन सभासदांच्या पोलिसांनी केलेल्या हत्येचे ते उत्तर असेल.

हे झालं हिंसाचारासंबंधी. अर्थव्यवस्थेने तर इतकी चमत्कारिक वळणं घेतली आहेत की, आज इटलीच्या परराष्ट्र–व्यापारामध्ये देशांतर्गत उत्पादनवाढीचा वेग जर ऋण असेल तरच समतोल प्राप्त होईल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पगारवाढी नुकत्याच झालेल्या असल्याने राष्ट्रीय अर्थव्यवस्था रोडावली आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारात इटलीचे चलन 'लिरा' याचीही किंमत घसरली आहे.

अशा परिस्थितीमध्येसुद्धा बेर्लिंगरने आन्द्रेतीला सहकार्य दिलं असतं; पण सोशॅलिस्ट आणि रिपब्लिकन्सनी आन्द्रेतीचं सरकार खाली खेचायचंच, असा निर्धार जाहीर केला तेव्हा कम्युनिस्टांनी राष्ट्रीय पातळीवर लढा उभारण्याचं आवाहन केलं. या तीन पक्षांचा पाठिंबा संपताच आन्द्रेतीचं भवितव्य निश्चित झालं.

## अमेरिकेचा पडद्यामागचा हात

अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष कार्टर नुकताच येऊन गेल्यानंतर परवाच्या त्याच्या स्वत:च्या व इटालियन कम्युनिस्टांच्या संदर्भातल्या त्या सरकारच्या काही उद्गारांवर युरोपात संताप व्यक्त करण्यात येत आहे. जानेवारीच्या पहिल्याच आठवड्यात ख्रिश्चन डेमोक्रॅटस्‌च पतन निश्चित झाल्यावर अमेरिकेचा इटलीतील राजदूत रिचर्ड गार्डनर या ताज्या घडामोडीची त्याच्या सरकारला सविस्तर माहिती देण्यासाठी व पुढे या बाबतीत काय करायचं, हे विचारण्यासाठी न्यूयॉर्कला गेला. कारण आन्द्रेतीचं सरकार

कोसळल्यास कम्युनिस्टांचं वर्चस्व वाढणार, हे उघड होतं. तो तेरा जानेवारीला इटलीला परत आला. या दरम्यान वॉशिंग्टनमधून एक पत्रक प्रसिद्ध करण्यात आलं. त्यात, युरोपातील कम्युनिस्टांचा प्रभाव कसा कमी होईल याकडे अमेरिका लक्ष पुरवेल, असा इशारा देण्यात आला. ११ जानेवारीला कार्टर पॅरिसमध्ये असताना त्याने लोकशाहीवर विश्वास नसणाऱ्या शक्ती युरोपात तोंड वर काढत असल्याबद्दल नक्राश्रू ढाळले होते. या दोन गोष्टींनी वातावरण एकदम बिघडलं. हा इटलीच्या अंतर्गत कारभारातला हस्तक्षेप होय, असा आरोप कम्युनिस्टांतर्फे करण्यात आला. 'युनिता' या कम्युनिस्ट मुखपत्रात अमेरिकेचा धिक्कार करण्यात आला. फ्रान्सचा पंतप्रधान् बार याने कोणत्याही लोकशाहीवादी राष्ट्राला सल्ले नको असतात, असं खडसावलं. त्याच्याच आधीचा पंतप्रधान मूरविलने, इतक्या उघड उघड आणि मूर्खपणाचा हस्तक्षेप अमेरिकनांनी कसा केला, यावर अचंबा व्यक्त केला. मॉस्कोलासुद्धा इटलीतील हा हस्तक्षेप इटलीशी मॉस्कोचे फारसे प्रेम नसतानाही सहन झाला नाही. स्पॅनिश कम्युनिस्ट नेता सॅन्तिॲगो कॅरिलोने परत युरोकम्युनिझमवरचा आपला विश्वास प्रकट केला आणि बड्या शक्तींना युरोकम्युनिझम फायद्याचा नसल्याचे या प्रकाराने सिद्ध झाल्याचे सांगितले. एकूण अमेरिकेने नको तिथं नाक खुपसून चटका बसवून घेतला.

### पुढचे चित्र

परिस्थिती इतकी चिघळलेली आहे की, अध्यक्ष लिओन आन्द्रेतीलाच परत एकदा निराळ्या लोकांबरोबर सरकार बनवायला सांगेल, असं दिसतं. कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे नष्ट झाल्याने कम्युनिस्ट पक्ष हा शासनाच्या दृष्टीने अपरिहार्यपणे चांगला पक्ष ठरतो. विशेषत: हिंसाचाराला आळा घालायला तोच समर्थ ठरू शकेल. शिवाय आन्द्रेती सत्तेवर राहाणं रिपब्लिकन पक्षाला अजिबात मान्य नाही. नवीन निवडणुका घेऊन परत तोच खेळ चालू ठेवणंही संभवते; पण यात जनतेचा लोकशाहीवरचा विश्वास उडवल्याची प्रक्रिया जलद करणे, याखेरीज फारसा अर्थ दिसत नाही.

कम्युनिस्ट, सोशॅलिस्ट व रिपब्लिकन, तिघानी सहा पक्षाचं एक 'आणीबाणी सरकार' स्थापन करून आणीबाणीच्या पातळीवर शासनयंत्रणा चालवावी, अशी मागणी केली आहे. कम्युनिस्टांना आता सत्तेत सहभाग हवा आहे. धोरणांना एक निश्चित दिशा देण्याच्या दृष्टीने ते उत्सुक आहेत; पण कम्युनिस्टांबरोबर कोणत्याही स्वरूपात सहभाग घेण्यास आन्द्रेतीचे ख्रिश्चन डेमोक्रॅट्स् नाकबूल आहेत. सोशॅलिस्टांबरोबर जायची त्यांची तयारी आहे; पण सोशॅलिस्ट कम्युनिस्टांना सोडू इच्छित नाहीत.

पोर्तुगालच्या मारिओ सोअरेसच्या सरकारचीच ही पुनरावृत्ती दिसते; पण इथं मात्र इटली अखेरचा निर्णय घ्यायला उभा आहे.

येत्या काही आठवड्यातच पश्चिम युरोपचा एक तुकडा लाल होतो आहे, हे दिसेल आणि त्याचा मार्चमध्ये असणाऱ्या फ्रान्सच्या निवडणुका, युरोकम्युनिझमचा बिगुल आणखी जोराने वाजणे असा दृश्य परिणाम दिसेल. ◻

## तुर्कस्तान :
### कवी पंतप्रधान होतो !

युरोपातील अस्थिरतेत आपणही मागे नसल्याचे तुर्कस्ताननेही वेळोवेळी सिद्ध केलं आहेच. जूनमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत सॅम्युएल देमिरेल याच्या अकार्यक्षम सरकारला बहुमत मिळून त्याची जस्टिस पार्टी आणखी दोन पक्षाच्या कुबड्या घेऊन सत्तेवर आली. नुकत्याच झालेल्या आयाराम-गयारामांच्या करामतीमुळे मात्र जेमतेम बहुमत असणारी ही त्रिपक्षीय आघाडी कोसळली. आणि रिपब्लिकन पीपल्स पार्टी ह्या प्रमुख विरोधी पक्षाचा नेता बुलेन्त एसेवित हा तिसऱ्यांदा पंतप्रधान झाला.

बुलेन्त एसेवित हे एक आकर्षक व्यक्तिमत्त्व आहे. विद्यार्थीदशेत त्याला संस्कृतबद्दल प्रेम निर्माण झाले. वयाच्या अठराव्या वर्षी त्याने रवीन्द्रनाथ टागोरांच्या काव्याचं भाषांतर केलं. बाविसाव्या वर्षीच तो किंचित् कवी म्हणून लोकांच्या समोर येऊ लागला होता. लंडनमध्ये तुर्की वकिलातीत ज्युनिअर असिस्टंट असताना टी. एस्. एलियटच्या काव्याचं त्याने भाषांतर केलं. त्याच सुमारास विश्वबंधुत्व, वगैरे कल्पनांवर काव्य करणाऱ्या या इसमाने १९७४ मध्ये पहिल्यांदा सत्तेवर आल्यानंतर सायप्रसमध्ये तुर्की सैन्य घुसवण्याचे आदेश दिले होते, त्यामुळे आधीच नाजूक अवस्थेत पोचलेले तुर्कस्तान-ग्रीस–सायप्रस संबंध काय वळण घेतील, हे लक्षणीय आहे. या आक्रमणात तुर्कस्तानने व्यापलेला प्रदेश परत देण्याविरुद्ध एसेवित फार आग्रही आहे. डाव्या विचारसरणीचा म्हणून ओळखला जाणारा हा पंतप्रधान स्वीडनचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून आहे.

विरोधाभासाचे उदाहरण म्हणून ग्रीसचा पंतप्रधान आन्द्रे पॅपेन्द्र आणि एसेवित यांची तुलना मनोरंजक ठरेल. दोघेही परंपरावादी म्हणून ओळखले जातात. अमळ विचित्र व अतर्क्य निर्णय घेण्याची दोघांची क्षमता आहे. किंबहुना म्हणूनच एसेवित ग्रीसशी बोलणी सुरू करील, असा अंदाज आहे

नाटो हा एक तुर्कस्तानपुढचा प्रश्न आहे. नाटोमध्ये ( North Atlantic Treaty Organization ) तुर्कस्तान १९५० साली सामील झालं. तेव्हापासून आतापर्यंत परिस्थितीत बराच फरक पडला आहे. नाटो हे तुर्कस्तानला विकतचं दुखणं होऊन बसल्यासारखं झालं आहे. नव्या पंतप्रधानांचं त्याबाबतचं धोरण अजून तरी संदिग्ध आहे, त्यामुळे युरोपमध्ये त्याविषयी उत्सुकता आहे.

अर्थात एसेवितची खरी परीक्षा बिघडलेल्या आर्थिक आघाडीवरच होणार आहे. रोमॅंटिसिझम आणि मिस्टिसिझममध्ये रमणारा तुर्कस्तानचा हा पंतप्रधान, याबाबत स्थिर सरकार मिळाले तरी काय करील, याबद्दल लोकही साशंकच आहेत. कारण देमिरेलच्या जस्टिस पार्टीचे अकरा खासदार फुटल्याने तो सत्तेवर आला. पण आता आणखी दोन जरी खासदार फुटले तरी हेही सरकार कोसळेल. राजकारण हे शांतता, प्रेम आणि न्याय आणण्याचं साधन आहे. पण या नेहरूस्टाईल हवेतल्या मनोऱ्यांना जर आधार मिळाला नाही तर तेही नेहरूस्टाईलच कोसळण्याची शक्यता आहे. किंचित डावीकडे झुकणारी एसेवितची रिपब्लिकन पार्टी आणि उजवीकडे झुकणारी देमिरेलची जस्टिस पार्टी यांचे संयुक्त सरकार, ही वस्तुत: तुर्कस्तानच्या दृष्टीने सर्वांत स्थिर व उपकारक घटना ठरली असती. पण दोघेही महत्त्वाकांक्षी व मतांना चिकटून राहणारे असल्याने व देमिरेलची पाळी झाल्याने आता एसेवितवर राज्य आलेले आहे.

या राजकारणाच्या धकाधकीत एसेवित सध्या करत असलेले भगवद्गीतेचं भाषांतर मात्र लांबणीवर पडलं आहे ! ◻

# महाराष्ट्राचे मतदान

## आणखी वाढायला हवे

वा. दा. रानडे

पाव शतकातील निवडणुकांत महाराष्ट्रातील मतदारांचा कल काय दिसून आला ? तो स्थिर आहे की बदलता आहे ? बदल असल्यास तो निश्चित, विशिष्ट दिशेने आहे, असे म्हणता येईल का ? पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी कायम राहिली. तिला प्रभावी आव्हान देणारा तुल्यबळ विरोधी पक्ष १९७७ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत येथे निर्माण होऊ शकला नाही. संयुक्त महाराष्ट्राचे प्रभावी आंदोलन १९५६ साली महाराष्ट्रात झाले. पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसचा दणदणीत पराभवही झाला. पण गुजरात, मराठवाडा व विदर्भाच्या पाठिंब्याने सत्ता काँग्रेसच्याच हाती राहिली.

काँग्रेसच्या सत्तेच्या मक्तेदारीस पहिले जबरदस्त आव्हान १९७७ च्या लोकसभा निवडणुकांनी दिले. काँग्रेसने प्रथमच बहुमत गमावले. महाराष्ट्राच्या एकूण ४२ जागांपैकी काँग्रेसला फक्त २० जागा मिळाल्या. आणीबाणीमुळे लोकमत काँग्रेसविरुद्ध होतेच. अल्पसंख्य मते मिळवूनही बहुसंख्य जागा काँग्रेसने यापूर्वी अनेकदा मिळविल्या आहेत. पण यावेळी तो डाव साधला नाही, याचे कारण जनता पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट, रिपब्लिकन पक्षातील खोब्रागडे व कांबळे गट यानी निवडणूक समझोता करून काँग्रेसविरोधी मते आपसात विभागू दिली नाहीत. त्यामुळेच त्यांना हे यश मिळू शकले. लोकसभा निवडणुकीनंतर गेल्या नऊ महिन्यात काँग्रेस अधिकच कमकुवत झाली आहे. राजारामबापू पाटील व त्याचे सहकारी लोकसभा निवडणुकाच्या वेळीच काँग्रेसमधून फुटले होते. नतर शंकरराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आणखी एक गट फुटून त्यांनी महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस स्थापन केली. येत्या विधानसभा निवडणुकीत जनता पक्षाबरोबर निवडणूक समझोता करण्याचे या पक्षाने ठरविले आहे. १९७८ च्या प्रारंभी इंदिरा गट अधिकृतपणे काँग्रेसमधून फुटला.

### बाळासाहेब देसाई 'जनता 'ला मिळाले

आधीच कमकुवत झालेल्या काँग्रेसची मते हा इंदिरा–गट विभागविल आणि मार्च १९७७ मधील लोकसभा निवडणुकीपेक्षाही अधिक मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात काँग्रेसचा पराभव होईल.

महाराष्ट्रातल्या पाव शतकातील विधानसभा निवडणुकात मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे होती.

| वर्ष | मतदानाची टक्केवारी |
|---|---|
| १९५२[१] | ४५·२५ |
| १९५७[२] | ५२·१४ |
| १९६२ | ६०·५५ |
| १९६७ | ६३·९७ |
| १९७२ | ६०·६३ |
| १९७७[३] | ६०·०२ |

१. हे प्रमाण त्या वेळचे मुबई राज्य, मध्यप्रात आणि हैद्राबाद राज्यातील मराठी भागातल्या मतदानाचे आहे.

२. हे प्रमाण त्या वेळच्या मुंबई राज्यातील मराठी भागातल्या मतदानाचे आहे.

३. हे प्रमाण लोकसभा निवडणुकीतील मतदानाचे आहे.

या आकड्यांवरून असे दिसते की, फक्त १९५२ च्या पहिल्या निवडणुकीत मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा कमी झाले. १९६७ च्या निवडणुकीपर्यंत मतदानाचे प्रमाण सतत वाढत गेले. १९६७ चे ६३·९७ टक्के मतदान हा महाराष्ट्राच्या दृष्टीने मतदानातील आतापर्यंतचा उच्चांक. पुढच्या दोन निवडणुकांत हे प्रमाण ६० च्या आसपासपर्यंत म्हणजे जवळजवळ १९६२ पातळीपर्यंत घटले. १९५७ ची निवडणूक संयुक्त महाराष्ट्राच्या आदोलनाने गाजली; पण त्या वेळी सुद्धा सरासरी मतदान ५२·१४ टक्क्यांवर गेले नाही. शहरी भागात ते ६३ टक्के व ग्रामीण भागात ५१ टक्के होते. म्हणजे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा प्रभाव मुख्यतः शहरातच होता., खेड्यापर्यंत तो फारसा पोचलेला नव्हता. काँग्रेस-राजवटीविरुद्ध असंतोष मोठ्या प्रमाणात असल्याने १९६७ मध्ये मतदान सर्वात जास्त झाले. देशातील आठ राज्यांत काँग्रेसने सत्ता गमावली. महाराष्ट्रातही मतदारानी काँग्रेसविरोधी कौल दिला; पण सत्ता काँग्रेसच्याच हाती राहिली. याचे कारण विरोधी पक्षाची एकत्रित आघाडी नव्हती. काँग्रेसला मोठे यश मिळाले ते मुख्यत. विरोधी पक्षाची मते आपापसात विभागली गेल्याने. विजयी काँग्रेस-उमेदवाराना ११६ मतदारसंघात ५०टक्क्यांपेक्षा कमी मते पडली व ८५ मतदारसंघात अपक्ष उमेदवार वगळून बाकी विरोधी उमेदवारांची एकत्रित मते काँग्रेस उमेदवारांच्या मतापेक्षा जास्त होती. याचा अर्थ ही मते विभागली गेली नसती तर या जागा गमावून इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही हुकुमी बहुमत गमावण्याचा प्रसंग काँग्रेसवर आला असता. जनता पक्षाच्या रूपाने विरोधी पक्ष एकत्र येण्यास आणखी दहा वर्षांचा काळ जावा लागला.

१९६७ पेक्षा १९७१–७२ आणि १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण घटले याचा उलगडा कसा करता येईल ? विरोधी पक्षाची एकजूट न दिसल्याने काँग्रेसला सत्तेवरून हटविणे शक्य नाही, अशी एक प्रकारची वैफल्याची व निराशेची भावना मध्यमवर्गीय मतदारांमध्ये निर्माण झाली होती. हा वर्ग मतदानाबद्दल उदासीन राहिला. त्यामुळे १९७१–७२ च्या निवडणुकात मतदानाच्या प्रमाणात घट झाली. १९७७ च्या लोकसभा निवडणुकाच्या वेळी विरोधी पक्ष जनता पक्षात एकत्रित आले होते, तरीही ही एकजूट कितपत टिकून राहील अशी शंका बाळगणारा एक प्रवाह मध्यवर्गीय मतदारामध्ये होता. तो उदासीन राहिल्याने मतदानाने १९६७ ची पातळी गाठली नाही.

भारतातील मतदानाची सरासरी तसेच इतर राज्यातील मतदानाशी तुलना करता महाराष्ट्रातील मतदानात कोणता वेगळेपणा दिसतो ? आतापर्यंतच्या विधानसभा निवडणुकांतील मतदानाची सबंध भारताची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे.

### विधानसभा निवडणुका मतदान

| वर्ष | मतांची टक्केवारी |
|---|---|
| १९५१–५२ | ४४·९ |
| १९५७ | ४८·४६ |
| १९६२ | ५६·५३ |
| १९६७ | ६१·१७ |
| १९७१ | ६०·२० |
| १९७२ विधानसभा | ५६·८४ |
| १९७७ लोकसभा | ६०·५४ |

टीप

१. १९७२ मध्ये १६ राज्ये व २ केंद्रप्रदेशांत निवडणूका झाल्या.उत्तर प्रदेश,केरळ,ओरिसा, नागालॅंड व पॉंडिचरीत निवडणुका नव्हत्या.

२. तेरा राज्ये व दोन केंद्रप्रदेशांत विधानसभा निवडणूका १९७७ मध्ये झाल्या-काश्मीर, नागालॅंड व त्रिपुरामधील मत. दानाच्या टक्केवारीचे आकडे उपलब्ध झाले नाहीत. ही टक्केवारी बाकीच्या राज्यांची आहे.

भारताच्या सरासरीशी महाराष्ट्राच्या मतदानाची तुलना करता असे दिसते की, १९७२ च्या निवडणुकांपर्यंत महाराष्ट्राची टक्केवारी भारताच्या सरासरीपेक्षा नेहमीच जास्त आहे. १९७७ च्या लोकसभा निवडणुकात मात्र ते भारताच्या सरासरीपेक्षा किंचित कमी आहे. महाराष्ट्रातील मतदान भारताच्या सरासरीपेक्षा सर्वसाधारणपणे जास्त आहे, ही अभिमानाची गोष्ट असली तरी काही राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत, हेही लक्षात घ्यावयास हवे.

१९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाच्या दृष्टीने आठ राज्य महाराष्ट्राच्या पुढे होती. त्यांचे मतदान पुढीलप्रमाणे होते. त्रावणकोर-कोचीन ६९·९, पेप्सू ५८·९, पंजाब ५५·५, मद्रास ५४·२, म्हैसूर ५०·८, आसाम ४९·६; सौराष्ट्र ४७·८, मध्यप्रदेश ४६·१. महाराष्ट्राचा नववा क्रम लागावा, ही गोष्ट महाराष्ट्राच्या पुढारलेपणाची निदर्शक खास नव्हती.

१९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्रात म्हणजे त्या वेळच्या द्विभाषिक मुंबई राज्यातील मराठी भागात ४८·४६ टक्के मतदान झाले. मतदानात या वेळी महाराष्ट्राचा सहावा क्रम लागला. आसाम, मध्यप्रदेश व मद्रासला महाराष्ट्राने मागे टाकले. त्यांच्यापुढे असलेल्या पाच राज्यांतील मतदान पुढीलप्रमाणे होते. केरळ ६६·६९, पंजाब ५९·३१, आंध्र ५७·२०, म्हैसूर ५३·४७ आणि पश्चिम बंगाल ४८·८१.

१९६२ च्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्राचे मतदान ५६·५३ टक्क्यांपर्यंत वाढले. पण राज्यवार मतदानात महाराष्ट्राचा क्रम सहावरून सातवर गेला. पूर्वी आघाडीवर असलेल्या पाच राज्यांच्या जोडीला गुजरातची भर या वेळी पडली. या राज्यांमधील मतदान पुढीलप्रमाणे होते. केरळ ८५·३६, मद्रास ७०·३५, पंजाब ६५·५८, आंध्र ६५·५३, म्हैसूर ५९·५३ आणि गुजरात ५७·९८. यापैकी केरळमधील मतदान १९६० मधल्या निवडणुकीतले असून १९६२ मध्ये तेथे निधानसभेसाठी निवडणुका नव्हत्या; पण १९६२ ला जवळचे म्हणून १९६२ च्या निणडणुकांबरोबरच तेथील मतदान विचारात घेतले आहे.

१९६७ च्या निवडणुकात महाराष्ट्राचे मतदान ६३·९७ टक्के झाले तरी राज्यवार मतदानात त्याचा क्रम सातवाच राहिला. त्याच्यापुढे असलेल्या सहा राज्यांतील मतदान पुढीलप्रमाणे होते. मद्रास ७६·६१, केरळ ७५·६८, हरियाना ७२ ५३, पंजाब ७१·०६, आंध्र ६८·१६ आणि पश्चिम बंगाल ६७·३४. गुजरात व म्हैसूरला महाराष्ट्राने या वेळी मागे टाकले. पण त्यांची जागा हरियाना व पश्चिम बंगाल या दोन राज्यांनी घेतली. त्यामुळे महाराष्ट्राचा क्रम होता तेथेच राहिला.

१९७२ च्या विधानसभा निवडणुकात सोळा राज्ये व दोन केंद्रप्रदेशांत ६०·२० टक्के मतदान झाले. महाराष्ट्रातील मतदानाचे प्रमाण ६०·६३ टक्के होते. मतदानात या वेळी महाराष्ट्राचा क्रम अकरावा होता. त्याच्यापुढे असलेल्या राज्यातील मतदान पुढीलप्रमाणे होते. केरळ ७५·८८, मणिपूर ७५·५९, तमिळनाडू ७९·८३, हरियाना ७०·४६, पंजाब ६८·६३, त्रिपुरा ६७·३६, काश्मीर ६२·१७, म्हैसूर ६१·५७, आसाम ६०·८४ आणि पश्चिम बंगाल ६०·८२. महाराष्ट्राचा क्रम खाली जाण्याचे कारण काश्मीर, म्हैसूर व आसाम यांनी वरचा क्रम मिळविला व मणिपूर व त्रिपुराला या निवडणुकांत प्रथमच राज्याचा दर्जा मिळाला. तेथील मतदानही महाराष्ट्रापेक्षा अधिक होते. आतापर्यंत महाराष्ट्राच्या सतत पुढे असलेला आंध्र या वेळी मागे पडला. केरळ व तमिळनाडूत १९७२ मध्ये निवडणुका नव्हत्या. तेथे १९७० व १९७१ मध्ये झालेल्या निवडणुका १९७२ ला जवळच्या म्हणून त्याच्याबरोबरीने विचारात घेतल्या आहेत.

१९७७ मध्ये तेरा राज्ये व दोन केंद्रप्रदेशांत विधानसभा निवडणुका झाल्या त्यांपैकी तीन राज्यांतील मतदानाचे आकडे उपलब्ध झाले नाहीत. बाकीच्या राज्यातील मतदानाची सरासरी टक्केवारी ५६·८४ टक्के होती. त्यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकात सबंध देशात ६०·९४ टक्के मतदान झाले होते. महाराष्ट्रात मतदानाचे प्रमाण ६०·०२ टक्के होते. १९७७ च्या विधानसभा निवडणुकीत पॉंडिचरी सोडून बाकी सर्वत्र मतदान लोकसभा निवडणुकीपेक्षा कमी झाले होते. आणीबाणीचा प्रश्न संपला होता तेव्हा लोकांमधील उत्साहाची लाट थोडी ओसरावी, हे स्वाभाविकच होते. येत्या फेब्रुवारीत होणाऱ्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांत हीच प्रवृत्ती चालू राहते की काही बदल होतो, हे आता पाहावयाचे.

मतदानाचा हक्क बजावण्याबद्दची जागरूकता कितपत वाढत गेली एवढ्याच दृष्टीने मतदानाचा विचार आतापर्यंत केला. महाराष्ट्रात मतदानाचे प्रमाण सर्वसाधारणपणे वाढत गेले असले तरी काही राज्ये प्रथमपासूनच महाराष्ट्राच्या पुढे आहेत. तेथे मतदानाचे प्रमाण जास्त का? मतदान वाढण्यासाठी राजकीय कार्यकर्त्यांची तेथे जाणीवपूर्वक काही विशेष प्रयत्न केले आहेत का? याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. साठ टक्क्यांवर समाधान न मानता महाराष्ट्रातील मतदानाचे प्रमाण आणखी वाढायला हवे.

महाराष्ट्रीय मतदाराची राजकीय जागरूकता कितपत वाढली आहे, राज्याच्या निरनिराळ्या विभागात तसेच समाजाच्या हरिजन व आदिवासी या गटामध्ये या जागरूकतेच्या दृष्टीने पंचवीस वर्षांत काय बदल होत गेला, याचा विचार पुढील अंकी. □

# ‘ युक्रांद ’चा राशीन-मेळावा

अन्वर राजन

स्वारगेटहून निघालेली एस.टी.पाच तासांनी संध्याकाळी सात वाजता 'राशिनला पोचली. कच्च्या रस्त्यावरच्या धुळीने वैताग आला होता. एस्. टी. स्टँडवर कार्यकर्ते भेटतील असा अंदाज होता; पण तसे झाले नाही. गावात उतरून कार्यालयाकडे चालू लागलो. ठिकठिकाणी पोस्टर्स लावलेली होती. भिंती रंगवल्या होत्या. ‘ युक्रांदचा श्रमिक मेळावा; पाहुणे जॉर्ज फर्नांडिस ’ इ. एस्. टी. स्टँडच्या समोरच मोठ्या मांडवाचे बांधकाम सुरू होते. एस्. टी.त माझ्याबरोबर मुंबईचा कार्यकर्ता उत्तम गाडे व खरपुडीचा एकनाथ काशिद हे होते.

रात्रीचा मुक्काम शाळेत होता. शाळेच्या पदाधिकाऱ्यांच्या जागी काँग्रेसचे अनेक लोक आहेत. तरी पण युक्रांदच्या मेळाव्याला जागा दिली होती. थंडी भरपूर होती; पण झोप व्यवस्थित लागली. दरम्यानच्या काळात अनेक स्थानिक कार्यकर्त्यांशी बोलणे झाले होते. जनता पक्षाचेही लोक भेटले होते.

दुसऱ्या दिवशी म्हणजे १५ जाने. ७७ ला सकाळी नऊ वाजता मेळाव्याच्या कामाला सुरवात होणार होती, ती अकराच्या सुमारास झाली. आठवडा बाजाराचा वार नसतानाही मेळाव्यामुळे भाजीपाला-विक्रेते व खेळ करून पैसे कमविणारे आले होते. मांडवाच्या समोर सापाचा खेळ सुरू होता; पण मेळाव्याचे काम सुरू होताच खेळ बंद झाला. खेळवाला शिव्याशाप देत पुढे चालू लागला.

रंगाचे भाषण सुरू झाले. आणीबाणीच्या पूर्वीपासून रंगा राचुरे ( हा मूळचा उदगीर कॉलेजचा विद्यार्थी ) या भागात काम करतोय. शेतावर व रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुरी करून पदवीधर झालेला रंगा या भागातल्या रोजगार हमी योजनेच्या कामावर लक्ष ठेवतोय. योजनेची कामे मंजूर करून घेण्यापासून योग्य मजुरी मिळवून देण्यापर्यंतची सर्व कामे करण्याचे तंत्र त्याने आत्मसात केलेय. हे काम करत असतानाच एकूण राजकारणावर व गावातल्या घटनांवर लक्ष ठेवून परस्परांचा संबंध लावून, सामान्यांपर्यंत पोचविण्याचे कामही तो व्यवस्थित करतो. त्यातच सामान्यांचे लढे उभे राहतात. गावातील दडपशाहीला आळा बसतो. त्याने भाषणात मेळाव्याचा हेतू सांगितला. पोटावरचा असंतोष ओठावर आणण्याचे काम युक्रांद करीत आहे, असे त्याने सांगितले... व श्रमिकांच्या मागण्या व अडचणी या मेळाव्यात मंत्र्यांसमोर मांडण्याचा हेतु त्याने स्पष्ट केला.

रंगाचे भाषण सुरू असतानाच मधून-मधून घोषणा देत, हलगी वाजवत शेतकरी ट्रक्समधून,ट्रॅक्टर्समधून येत होते, त्यात सामील होत होते. प्रत्येक ट्रकवर व ट्रॅक्टरवर जनता पक्षाचा ध्वज आवर्जून लावलेला असायचा.

रंगाचे भाषण संपल्यावर प्रा. भालचंद्र मुणगेकर हमीद दलवाई यांनी केलेल्या कार्याची माहिती देण्यासाठी उभे राहिले. अत्यंत कष्टपूर्वक व अभ्यासपूर्वक तयार केलेली माहिती अवघड शब्द व शहरी भाषेतून मांडल्यामुळे भाषण लोकांच्यापर्यंत पोचू शकले नाही. म्हणून पूर्वी बंद पडलेल्या गारुड्याचा खेळ पुन्हा एकदा सुरू झाला. मुले व अनेक जण खेळ पाहत थांबली.

## ठराव

पहिल्या सत्रातला शेवटचा भाग ठराव मांडणे व तो संमत करणे, ( टाळ्यांच्या कडकडाटात ) हा होता. प्रत्येकाला काम मिळण्याचा हक्क घटनेने दिला पाहिजे, असा पहिला ठराव मांडला गेला. त्या ठरावावर भाषण झाल्यानंतर काही जणांनी, विशेषत: पुढच्या भागातल्या लोकांनी, टाळ्या वाजविल्या. ठराव समत झाल्याचे जाहीर झाले; पण अध्यक्ष उठले आणि त्यांनी सांगितले की, मागच्या लोकांनी टाळ्या वाजवल्या नाहीत; ठराव समत होण्यासाठी भरपूर टाळ्या पाहिजेत. मग मागच्या लोकांनीही टाळ्या वाजवल्या. त्यानंतरचा प्रत्येक ठराव याच पद्धतीने संमत करण्यात आला. यात महत्त्वाचे ठराव म्हणजे किमान वेतन चार किलो धान्याच्या किंमतीइतके असावे; स्त्रीपुरुषांना समान वेतन मिळायला पाहिजे व अन्न-धान्याचे व शेतीमालाचे भाव स्थिर ठेवून बांधून द्यायला पाहिजेत, हे होते. शेतीमालाच्या भावासंबंधीचा ठराव मला अपूर्ण वाटला. कारण एकूण भावपातळीशी त्याचा संबंध काय असावा, हे त्यात स्पष्ट नव्हते. छोट्या शेतकऱ्यांचे खाजगी कर्ज माफ केले; पण सरकारी कर्ज व सहकारी संस्थेचे कर्ज माफ केले नाही. तरी ते कर्जही माफ करावे, असा ठराव त्यानंतर संमत झाला. छोटा शेतकरी कोणाला म्हणावे याबाबतीतली एक वेगळी कल्पना शशिकांत अहंकारी यांनी मांडली. आताच्या व्याख्येत ज्यांच्याकडे अडीच हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे तो अल्पभू-धारक म्हणजेच छोटा शेतकरी मानला जातो; परंतु नवीन कल्पनेत जमीन किती आहे, त्यापेक्षा तिच्या प्रतीवरून व तिच्या उत्पादकतेवरून आवकधारकत्व ठरवावे, असे सुचविण्यात आले.

शिवाय दुष्काळात कर्जफेड थांबवण्यात येते; पण त्यावर व्याज आकारण्यात येते. तरी दुष्काळाच्या काळातले व्याज आकारू नये व कर्जफेड होत असताना प्रत्येक हप्त्यामधला निम्मा भाग कर्जापोटी व निम्मा भाग व्याजापोटी आहे असे समजले जावे, अशी मागणी करणारा ठराव संमत करण्यात आला.

दलितांनी बौद्धधर्म स्वीकारल्यानंतर त्यांच्या सवलती बंद करू नयेत, अशीही

मागणी करण्यात आली व ज्या भागात दलितांच्यावर अत्याचार होतात त्या भागातल्या संबंधित सरकारी अधिकाऱ्यांना व पोलीस अधिकाऱ्यांना ताबडतोब बडतर्फ करावे व अत्याचार करणाऱ्यांना कडक शासन व्हावे, हा ठराव संमत करण्यात आला.

महाराष्ट्रात गाजत असलेला व राजकीय पक्षांना अडचणीत टाकणारा प्रश्न म्हणजे राज्यकर्मचाऱ्यांचा संप. या मेळाव्यात संपाला पाठिंबा देण्यात आला. ठरावाच्या भाषणात प्रा. राम बापट यांनी जनता पक्ष व कॉंग्रेसपक्षावर भरपूर तोंडसुख घेतलं. वसंतदादा पाटील व पंतप्रधान मोरारजी देसाई कर्मचाऱ्यांत फूट पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा आरोप त्यांनी केला. संप करू नका असा सांगण्याचा हक्क फक्त भांडवलदार व बागायतदाराच्यावर बंधन घालणाऱ्या व त्यांना रोखणाऱ्या सरकारलाच आहे. संघटनेच्या बळावर लढा पुढे नेता येतो, असे या संपावरून सिद्ध होत आहे. यातून श्रमिकांच्या इतर लढ्यांना प्रेरणा मिळेल म्हणून या संपाला पाठिंबा दिला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## दुसरे सत्र

वेगवेगळ्या भागातून आलेला सात-आठ हजार शेतकऱ्यांचा जमाव, (त्यात पाच-सहाशे स्त्रिया) सभास्थानी शांतपणे बसून मंत्र्यांची वाट पाहत होत्या. मंत्री स्थानापन्न झाले. युक्रांदचे पदाधिकारी व्यासपीठावर स्थानापन्न झाले. इतक्यात स्टेजच्या मागच्या भागातून गोंधळ सुरू झाला. 'कुमार सप्तर्षी स्टेजवर आलाच पाहिजे.' अशी घोषणा सुमारे शंभर-दीडशे युवक देत होते. काही वेळ घोषणा झाल्यानंतर कुमार सप्तर्षी स्टेजवर आले; परंतु घोषणा काही केल्याने थांबेना. गोंधळ वाढत गेला. काही लोकांनी जनता पक्षाचा ध्वज व्यासपीठावर लावला. युक्रांदच्या कार्यकर्त्यांनी हरकत घेतली. धक्काबुक्क्यांनी तो ध्वज शेवटी व्यासपीठावर लावण्यात आला. दरम्यानच्या काळात युक्रांद मुर्दाबाद—युक्रांद झिंदाबादच्या घोषणांचे युद्ध सुरू होते. डॉ. सप्तर्षींनीही जमावाला शांत होण्याचे आवाहन केले. धक्काबुक्कीत माईकची वायरही तुटली. त्यामुळे कोणाचे बोलणे ऐकू येईनासे झाले. शेवटी काही लोकांच्या समजुतीमुळे व पोलिसांच्या सहाय्याने शांतता प्रस्थापित झाली. माईक बंद असताना व गोंधळ सुरू असतानाच रंगाने आपले भाषण सुरू केले.

असा गोंधळ होण्याची शक्यता आहे, असे मला आदल्याच दिवशी लोकांशी बोलत असताना लक्षात आले होते. राशीन गावात युक्रांद व जनता पक्षाची स्थापना व वाढ साधारणतः समांतर रित्याच झालेली आहे. दोघांनीही आतापर्यंतचे महत्त्वाचे लढे संयुक्तपणे लढवलेले आहेत व दडपशाहीचे वातावरण कमी करण्यात दोघांचाही समान वाटा आहे; पण दोघांचे अस्तित्व स्वतंत्र असल्यामुळे त्याच्यामध्ये स्पर्धेची भावना आहे. त्यातून अधूनमधून स्थानिक पातळीवरचे कार्यकर्ते एकमेकात भांडणही करतात, परत एकत्र कामही करतात. या सभेच्या आधीही काही मुद्द्यांवरून वादावादी झाली होती. जॉर्ज फर्नांडीस राशीनमध्ये येत आहेत, तेव्हा त्यांच्या स्वागताचे फलक लावण्याचे जनता पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी ठरवले. परंतु युक्रांदच्या लोकांनी हा कार्यक्रम युक्रांदचा आहे, या कारणासाठी फलक लावण्यास विरोध केला. त्यातून काही कार्यकर्ते दुखावले गेले. तसेच या मेळाव्याच्या वेळी कुमार सप्तर्षी यांना स्टेजवर बसविण्यात येणार नाही, असा युक्रांदने काही दिवसापूर्वी निर्णय घेतला होता. या क्षुल्लक कारणाचे मेळाव्याच्या वेळी गोंधळात रूपांतर झाले.

त्यानंतर मात्र मेळाव्याचे काम व्यवस्थितपणे पार पडले.

जयप्रकाश नारायण यांनी पाठविलेला संदेश वाचून दाखविण्यात आला. युक्रांदला शुभेच्छा देताना त्यांनी शोषण व अन्याय यांच्या विरोधात दलितांनी व शोषितांनी स्वतः संघटित होणे आवश्यक आहे, असे विचार मांडले आहेत. सर्वोदयी चळवळीतून अनेक पक्ष दलितांसाठी पुढे येतील, असे वाटले होते; पण वर्गीय स्वार्थ अभेद्य दगडाप्रमाणे असतात. म्हणून त्यांच्या बाहेर राहून शोषितांना संघटित करण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली व युक्रांद या प्रकारचे काम करते, म्हणून शुभेच्छा पाठविल्या.

जॉर्ज फर्नांडिस यांनीही आपल्या भाषणात वर्गीय स्वार्थाच्या अभेद्य भिंतीबद्दलच्या व्यथा सांगितल्या. फक्त सत्तेवर शोषणाच्या विरुद्ध लढणारे गेले की परिवर्तन होत नाही, तर जिथे परिवर्तन करायचे आहे तिथे संघर्ष करायला पाहिजे, अन्यायाच्या विरुद्ध झगडायला पाहिजे असे सांगितले.

मागण्यांबद्दल त्यांनी काही निश्चित स्वरूपाचे आश्वासन दिले. त्यात लहान उद्योग खेड्यात काढणाऱ्यांना संपूर्ण सहकार्य व मदत आणि त्यासाठी मोठ्या उद्योगधंद्यांवर बंधने घालण्याचे आश्वासन दिले. भ्रष्टाचार कमी व्हावा व रेशनदुकानात व सिमेंटदुकानात काळा बाजार होऊ नये म्हणून कार्यकर्त्यांनी व लोकांनी लक्ष द्यावे, अशी त्यांनी विनंती केली.

सभा संपल्यावर त्या दिवशीचा कार्यक्रम संपला. आलेले शेतकरी व शेतमजूर परत आपल्या गावाकडे परतले. थोडा वेळ रेस्ट हाउसवर कार्यकर्त्यांशी बोलल्यानंतर मातंग वस्तीला जॉर्ज फर्नांडिस यांनी भेट दिली. रोजगार मिळत नाही अशी तक्रार करणाऱ्यांना मदत करण्याचे व जर काही निश्चित स्वरूपाची योजना तयार केली तर कर्ज देण्याची तयारी त्यांनी दर्शविली. मातंग वस्तीला भेट देणारे हे पहिलेच केंद्रीय मंत्री. त्यामुळे लोकांना त्यांचे कौतुक वाटले. जॉर्ज फर्नांडिसचा जयजयकार झाला आणि त्यानंतर मंत्रिमहोदयांनी राशीनगाव सोडले.

## लोकसमित्या

दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाला सुमारे ८०–९० कार्यकर्ते उपस्थित होते. रंगा वैद्य व माधव गडकरी पाहुणे म्हणून उपस्थित होते. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमात संदिपान बडगिरे यांनी लोकसमिती या विषयावर मांडलेले विचार अत्यंत महत्त्वपूर्ण वाटले. त्यावरचे टिपण करून लोकांना दिले होते. अनुभवाच्या सामग्रीतून तयार केलेल्या या टिपणात या समितीच्या बाबतीतील विचार अत्यंत स्पष्ट होतात. यात पक्षातीत पद्धतीने लोकांना संघटित करून कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे व शासनावर तसेच लोकप्रतिनिधींवर नैतिक अंकुश ठेवणे ही मध्यवर्ती कल्पना दिसते. यात लोकसमितीच्या धोरणांबाबत असेही म्हटले आहे की, लोकसमितीने जनतेच्या बाजूच्या उमेद-

याराचा अथवा पक्षाचा प्रचार करणे हा भाग युक्रांदच्या भूमिकेपेक्षा वेगळा व नवीन वाटला. हा भाग अधिक स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. इतर जे कार्यक्रम व धोरणे त्यात स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे तो कोठल्याही पक्षापेक्षा व संघटनेपेक्षा वेगळा नाही.

यानतर रामराव जाधवानी परभणीत त्यांनी चालविलेल्या प्रयोगाची माहिती दिली. तसेच समिश्र वस्ती असलेली 'क्रांतिनगर' नावाची झोपडपट्टीची उभारणी व त्या लोकांच्या धर्मश्रद्धेच्या जागी विज्ञाननिष्ठा निर्माण करून जातिभेद कमी करण्याच्या प्रयोगाचे अनुभव सांगितले. त्या भागातल्या राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांचेही त्यांनी गंमतीशीर भाषेत किस्से सांगितले.

त्यानंतर ठाणे आदिवासी भागात काम करणारे गिरसे, वीरगाव (ता. वैजापूर, जि. औरंगाबाद) भागात काम करणारे बाबासिंग जगकरवदिनी माळघाचे बलभीम भोसले यांनी आपापले अनुभव सांगितले.

रंगा वैद्य यानी छोटधा शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याबाबत आग्रह धरला व त्यासाठी मार्गदर्शन केले, तर माधव गडकरी यांनी शहरातून या प्रकारचे काम वाढायला पाहिजे जेणेकरून इतर ठिकाणी या कामाचा प्रसार गतीने होईल, असे सांगितले.

दुपारची ३-१५ ची गाडी असल्यामुळे जरा घाईनेच दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम आटोपता घेतला.

या मेळाव्यात मुंबईचे ४०-४५, औरंगाबादचे १५, परभणीचे १५-२० व लातूर-बीड भागातून ७-८ कार्यकर्ते आले होते. पुण्यातल्या कार्यकर्त्यांची गैरहजेरी जाणवत होती. युक्रांदच्या मेळाव्याला जॉर्ज फर्नांडीस हे जनता सरकारचे मंत्री बोलविणे चुकीचे आहे, या भूमिकेतून पुण्याच्या कार्यकर्त्यांनी बहिष्कार टाकल्याचे कळले.

## साहित्य संमेलन आणि युक्रांद

मेळाव्याच्या पहिल्या दिवशीचा कार्यक्रम संपल्यानतर रात्री काही कार्यकर्ते व मेळाव्याला आलेले हितचिंतक हे रेस्टहाउसवर चर्चा करीत होते. त्याठिकाणी मी उपस्थित असल्याने मनात घोळत असलेल्या दोन-तीन प्रश्नाची उत्तरे सापडली.

पहिला प्रश्न मुंबईचे सामाजिक कार्यकर्ते श्री. शशी मेहता (ज्यानी साहित्य समेलनात विषयनियामक समितीच्या दुर्गाबाईंबाबतच्या ठरावाविरुद्ध निदर्शन केले होते.) यांनी उपस्थित केला. त्यानी विचारले, 'ज्या पद्धतीने युक्रांदने साहित्य संमेलनात निदर्शने करून कार्यक्रम बंद पाडण्याचा प्रयत्न केला त्याच पद्धतीने आज सकाळच्या मेळाव्यात जनता पक्षाने निदर्शने करून कार्यक्रमात व्यत्यय आणला. हे जर असेच चालू राहिले तर लोकशाही पद्धतीने कोणाला काही कार्यक्रम यापुढे पार कसे पाडता येतील ? मूळ प्रश्न जरी प्रवृत्तीच्या विरुद्ध होता तरी साहित्य समेलनात काय घडले व ते योग्य कसे होते यातच तो प्रश्न अडकला व साहित्य समेलनात युक्रांदन केलेल्या निदर्शनांमागची भूमिका स्पष्ट झाली. अर्थात उत्तर देताना प्रत्येकजण वेगवेगळे मुद्दे माडत होता. त्यात काही मुद्दे परस्परविरोधीही होते; पण भूमिका जी स्पष्ट झाली ती अशी: एक तर समेलन उधळण्याचा हेतू नव्हता तर प्रतीकात्मक निदर्शने सुमारे तासभर करून बाहेर निघून जाण्याची योजना होती.

दुसरा मुद्दा म्हणजे, साहित्याचे राजकारणाशी असलेले नाते. १९४२ पासून ४७ पर्यंत साहित्य समेलनात स्वातंत्र्ययुद्धाचे उमटलेले परिणाम, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळातील, गोवा मुक्तिआंदोलनकाळातील साहित्यसमेलन, या समेलनाच्या अध्यक्षाचे भाषण जर पाहिले तर प्रचलित राजकारण हे साहित्यसमेलनाचे मध्यबिंदू असल्याचे दिसतात. ना. सी. फडके, आचार्य अत्रे हेही अध्यक्षपदी होते; तेव्हा साहित्य संमेलनात राजकारण आलेले आहे व संमेलनाच्या अध्यक्षाचे राजकीय मत लक्षात घेतले गेलेले आहे. त्याला महत्त्व देण्यात आलेले आहे आणि म्हणून राजकीय कारणावरून साहित्य समेलनात निदर्शन करण्यात काहीच चूक नाही.

परंतु इतरांची वेगवेगळधा कारणासाठीही एकाच वेळी निदर्शने झाली. दलित पँथर व इतर संघटना एकाच वेळी उभे राहून निदर्शने करू लागल्या. हे सर्व होणार हे आमच्या लक्षात आले नव्हते, ही चूक युक्रांदच्या कार्यकर्त्यांनी मान्य केली. उत्तर देणाऱ्यांत प्रा. राम बापट, मुबईचे आनंद करंदीकर व हुसेन दलवाई मुख्य होते.

तिसरा मुद्दा त्यानी सागितला की, पु. भा. भावे यांच्यासारखे प्रतिगामी साहित्यिक जेव्हा अध्यक्षपदी निवडले जातात तेव्हा त्याविरुद्ध प्रभावी आवाज उठणे आवश्यक होते. बाहेर उभे राहून निदर्शन केले असते वा पत्रक काढून स्वस्थ राहिलो असतो तर वृत्तपत्रात एवढी प्रसिद्धी मिळाली नसती. या कल्पनेने संमेलनात उठून निदर्शने करण्याची कल्पना होती, जेणेकरून वृत्तपत्रात व्यवस्थित बातमी येऊ शकेल.

अर्थात युक्रांदवर नंतर टीका करणाऱ्यांनी आम्हाला पु. भा. भावेंची मते मान्य नाहीत, असेच सांगितले आहे हे सुद्धा बाहेर आले याचे कारण युक्रांदने केलेली निदर्शने.

अर्थात मेळाव्यात झालेल्या गोंधळाबाबत त्यांनी मान्य केले की, साहित्य समेलनात व येथे ज्या पद्धतीने निदर्शने केली त्यात फारसा फरक नव्हता; फक्त कारण निराळे होते.

गोंधळाचे परिणाम काय होतील याबाबत उत्तर मिळाले - फारसे परिणाम होणार नाहीत; पण एक फायदा होईल. आम्ही जनता पक्षाचाच एक भाग नाही आहोत, हे अधिक स्पष्ट होईल. तसेच गोंधळ सुरू असताना सात-आठ हजार लोक शात राहिले त्यावरून आमची शक्ती येथे कमी पडत आहे, हेही आम्हाला समजले.

दुसरा प्रश्न अनेकानी मला विचारला होता, जॉर्ज फर्नांडिस युक्रांदच्या मेळाव्यात कसे चालू शकतात ? किंवा जॉर्ज फर्नांडिस यांना बोलावण्याचा हेतु काय ?

त्यावर असे सांगितले गेले की, श्रमिकाच्या मागण्या धोरण ठरविणाऱ्यांपर्यंत जाव्यात व इथल्या नोकरशाहीवर दडपण यावे, यासाठी मंत्र्यांना बोलावले.

या वेळी पॉप्युलर प्रकाशनाचे श्री. रामदास भटकळ व मुंबईचे डॉ. व सौ. पालकरही उपस्थित होते.

एकंदरीत या शिबिरामुळे राशीन परिसरात निश्चितच चागले परिणाम होतील; पण मला काही प्रश्नांचे उत्तर मिळू शकले नाही. एक तर युक्रांदची भूमिका भारतात समाजवादी क्रांतीसाठी गैर ससदीय मार्गाने श्रमिकाना व दलिताना संघटित करायचे, ही आहे. तेव्हा अखिल भारतीय राजकारणात त्यासाठी परिणामकारकरीत्या काम करता कसे येईल, याचा विचार कुठेही होत असताना दिसला नाही.

दुसरे म्हणजे ससदीय लोकशाही भारतात असावी अशी युक्रांदची भूमिका आहे. तर त्या भूमिकेचा आणि युक्रांदचा काय सबंध आहे, त्याबाबतीत वैचारिक स्पष्टता जाणवत नाही.

तरी पण लोकसमितीचा कार्यक्रम व राशीनसारखे काम इतर गावांत पोचवण्यात युक्रांद यशस्वी झाली तरी या मेळाव्यातून निर्माण झालेला उत्साह सार्थकी लागला, असे म्हणता येईल. ☐

## कथा

# चैती

## रामकृष्ण कलबुर्गे

चैती झोपडीच्या दारात डोक्याला हात लावून बसेल हाये. कोमेल फुलासारखा तिचा चेरा सुकेल हाये. ती आज पाटलाच्या कामाला जाधेल निही. दिसाचा गोळा डोक्यावर आगं जसी पाखडतोय! बाहेर नागव निही यवढं निंबर तापलय. समुरचा वाघोबाचा डोंगर वणवा पेटल्यागत वाटतोय. चैती डोंगराकडं नांगतच ऱ्हाते. आपल्या संसारातबी असाच वणवा पेटलाय अन् त्या वणव्यात आपल्या शिलाची आता जळून रखाडी होल असं तिला वाटतं. रातीचा परसंग पुना पुना तिच्या नजर समुर येतंय...

...रोजच्यासारखं पाटलाकडलं काम आपोटून दिवे लागायच्या टायमाला ती घरा जाया निघाली. तवा 'माडीवरशा पाटलानं हाक दिली. तिला जराक आचंबाच पडला. माडीवर जाया लाजबी वाटली; पण मालकाचा हुकूम हाये, तर गेलंच पाहिजे. ती, तरातरा पायऱ्या चढून गेली. जराक भीतभीतच आत गेली. खालत मान घालून उबी ऱ्हायली. तसा हुकूम सुटला, 'जराक डोकं चेप ना जा!' मंतरल्यासारखं चैती खाटजवळ सरकली. एक तोकडी चड्डी घालून पाटील उघडाबंब पडेल व्हता. टोनग्यागत मातलाता! तिला ओशाळी जसी वाटली. ती हळूहळू डोकं चेपू लागली... त्येची पापी नजर तिच्या चेऱ्यावरशा अन् छातीवरशा फिरत व्हती. ती त्येचं थोबाड नागाय खुशी निही! मंगा तो जराक दात विचकून हासला... ना लगेच त्यानं तिचा हात गच्च पकडला. मान हिलवून खाटवर येया खून केली. चैती फार भियाली. गडबडली. हात सोडून घेया धडपडाय लागली. तसा त्यो लांडगा गुरगुरला— 'चैतेऽऽ गुमान ये. जादा नखरा बरा नाय. चैत्या माझ्या गडी हाय. तू माझ्या गड्याची बायको हायेस. तवा माझाबी हक्क हाये.'

चैतीचं सारं अंग कापाय लागलं. तिला कायी सुचना. तरी हिम्मत करून ती म्हणाली, 'पाटलाऽऽ... आरं मी तुह्या गड्याची बायको हाये, पणीक तुझी निही. गडीबी एक माणूसच हाये. त्यालाबी आवरू असते!'

'उगी राहा. मला आवरूच्या गोष्टी शिकवू नको. मीच लगीन केलाय तुझं. माझं आयकशील तर काय सुदीक् कमी पडू देणार नाय तुला!' पाटील डोळं वटारून सांगत व्हता.

'लगीन केलाय तर, मला काय तुह्यानं विकत घेदेल निही. कष्ट करून जगताव आमी! मला तुझं फुक्कटलं काय सुदीक नको. सोड मला... सोड...' चैती हात सोडून घेया धडपडत व्हती.

पाटलाचं डोकं भडकलं. तांबडंलाल डोळं आग जशी पाखडाय लागले. आजपरेंत एका मामुली गड्याच्या बायकोचा असा उलटा जबाब आयकायची त्याच्या कानाला सवय निही. 'तुज्या आयला मीऽऽ... मला उलटा जबाब देतेस, चार मन भात नि चारशे रुपये खर्च केलेत तुझ्यावर, ते का फुक्कट सोडंन.' त्यानं तिच्या हाताला जोरात हेसकला. चैती पाटलाच्या छाताडावरच ओनवी पडली. वादळात सापडेल केळीसारखी तिची अवस्था झाली. ती आरडून उठली. मासळीसारखी तडफडाय लागली. तरी उपेग निही. तवा ती कडकडून त्येच्या हाताला डसली. चवताळलेल्या नागिणीसारखी! चाव्यासरशी त्यानं हात मोकळा केला. चैती सुटली. वाऱ्यासारखी जिना उतरून पळाली. ओसरीतली मानसं डोळं फाडून नांगतच ऱ्हायली... राती तिला बरा ताप भरलाता. घरा कुणाला शब्द सांगेल निही.

...चैतीचा लगीन होन आजशा आठ दिस होदेल निही. अद्याप अंगाची हळद निघेल निही. चैत्या लहान व्हता तवाशा पाटलाचा गोवारी हाये. आता पाटलानं लगीन केलाय. लग्नगडी झाला! पाटलानं लग्नाला चार मन भात, रोख दोनशे रुपये आन् कपडा मिळून एकंदर सहाशे रुपये खर्च, दिधेल हाये. कर्ज फिटल तावपरेंत चैत्याला बायकोशा दोघाहो पाटलाच्या घरा खपाय लागंल. लग्नाच्या दुसऱ्या दिसीच पाटलानं दोघाना कामावर व्हारला. त्या दिसापासून त्येचा चैतीवर डोळा हाये. चैती रूपाला हाये, तसी गुणालाही बेस हाये. ती त्याला दाद देई निही. तिला तसला उसाटलेपणा माहीत निही. पाटलाला चैती आली तवाशा झोप निही. चैत्याला सोब निही असा चैतीच्या जवानीचा रुबाब हाये. सोनचाफ्याच्या फुलासारखं चैतीचं गोरं अंग निबरात तकाकायचं! पाटील टपोरं डोळं काढून नांगतच ऱ्हायाचा. त्यानं मोपदा चैतीला मतलवायची खटपट केली; पण जमावच येय निही. आजपरेंत कित्येक गड्यांच्या बायका त्येच्या नजरखाल आल्या. पणीक चैती त्येंच्या चालीवर अद्याप निहीच येय. शेवटाला पाटलानं इचार केला ...'आयलाऽ! जरबच दावाय पायजे. बलसक्ती केल्याशिवाय काम होई निही...' मणून त्यान ह्यो परसंग घडवून आनला.

चैतीला बसला जागा उठव निही. तिला त्या राकेसाची धास्ती जसी लागेल हाये. इचार करून तिचं डोकं गरगराय लागलंय... पाटलानं लगीन केलाय तर काय उपकार झालं...कष्ट करून त्येचं पैसं आपु वालतावच ना!...पैसं काय फुक्कट दिधेल निहीत ...दुप्पटीचं याज लावून पैसं घेल...आखा जलम दोघाहो त्येच्या घरा कष्ट उपसावं लागंल. एक पायली मजुरीवर आखा दिस ढोरासारखं राबायचं...? एक पायली खाल एका मानसाचाहो पोट भर निही...गड्याला तर दर महिन्याला वीसच पायली मंजुरी मिळते. दहा पायली कर्जाचे वालून घेतान... दहा दिस महिन्यातलं फुक्कट खपायचं... त्येच्यापोटी वर्साला तीसच रुपये कर्जातले कमी व्हतील...मेलं तरी कर्ज शिल्लकच रहल...सासरहो अद्याप गडीच हाये...

लग्नावर पाशे रुपये काढेल हायेत. अद्याप पैसं फिटेल निहीत.. ढोकरा झालाय तरी अद्याप राबतोया...आपु हो तसंच कष्ट उपसून मरू...? गड्याची बायको मणून त्या मेल्याचा जलमभर तरास सोसू...? जित्या जिवान मुड्द्यासारखं जगू...?...निही! कष्ट करून दुसऱ्याची लाचारी पत्करायची निही..:त्या परिस निगुत मेले तरी चालंल, ...चैतीच्या मनात इचाराचं वादळ उठेल हाये.

पाटलाच्या कामावरशा अद्याप मानस सुटेल निहीत. सुटायचा टैम होदेल हाये. चैत्या आता कामावरशा येल. सासु–सासरा दोघा ढोकरे हो पाटलाच्याच कामाला हैत. चैतीनं रातीशा धान जेवेल निही. पोटात भुकेचा वणवा पेटेल हाये, तरी तिनं अद्याप राधेल निही. घरात काय हाये त् रांधेल...? कामावरशा मानसं मजुरी घेन येतील तवा ती सगळा करंल.

दिस डोक्यावरशा ज़राक घसरलाता. पाटलाच्या कामावरची मानसं सुटेल हायेत. एकेक जन वटीत पायली मजुरी घेन येतान. निबरात पाय लासतान तर परत्येकजन धावतीवर जसी चालतान. जाता जाता जो तो चैतीकडं नांगून एकच सवाल इचारतो. 'कामाला निही येधेल ग बाय?' चैती सगळघांना एकच जबाब देते—'हां! जराक तब्येत नरम हाये.'

चैती वाटकडं नांगतच हाये. चैत्या ना त्येचा आस–बास तिघाहीं येत व्हती. ढोकरीनं सुड्क्यात सगळयाची मजुरी घेदेल हाये. *ढोकरा माजेल जसा हासे. त्येला चालव* निही. तोंडान काय तरी बडबडतोय. चैत्याची हो जराक ऐस जातेय. तो हो जराक पिदेल हवा. पाटलानं मुद्दाम आज पाजलिवी. दोघांच्याहो चेऱ्यावर दारूच्या नशेची धुंदी चढेल हाये. चैती दारातशा उठते. चुलीशा जान बसते. आग पेटवते. ढोकरीनं सुडक्यातला भात उखळात पाखडला अन् चैतीला हाक दिली—'पोरीऽ! अगऽऽ ह्या नांग! मालकानं आज तुझी हो मजुरी दिधेल हाये. मालक लई बेस माणूस हाये ग!' चैती चकीतच व्हते. पाटलाच्या उदार मनाआड दडेल, त्येचा दुष्ट कावाबी तिनं धेनला...'त्याला वाटत हवा फुक्कटचा खाया देन मतलवलाका आपसुक आपल्या तांब्यात न्हातील. आदवासीची आबरू पैशाच्या कवडीनं मोजतान हे बंगलवालं! आमच्या आडाणीपणाचा फायदा घेतान...' सासूच्या भोळसर बोलण्याचा तिला राग येतो. त्यावर सासुसला चार शब्द सांगावं असं तिला वाटतं.; पण उगच न्हाते. क्या? तर बाहेर चैत्या ना सासरा दोघाहो माजेल फिस हायेत. माजेल मानसासमुर जास्ती बोलून काई उपेग निही!

बाहेर ओटीवर चैत्या अंग टाकून पडलाता. ढोकऱ्याची बडबड चालूच होये... 'प...पाटील आपला मालक हाये... निही ... देवच हाये... देव...आपु त्येऽच्या मुडावर जगताव. ... मिहघान आज पिदेल हाये .. मालकानं देली त् मिहघान् पिली. ... पिली तरी आपु कोणाला वॅट सांगू निही ..! भांडत निही ... माऽऽय झंऽऽ भानगड करायची निही...!' असा काय तरी वडबडत व्हता. चैताला आयकून शीण जसा येतो. तरी गप्प हाये ...

दुपारी दोघाहो बाप-ल्योक कामाला जाधेल निहीत. बेस हायेत त् कामाला जातील? माजून फिस्स्! पाटलानं हो हाकुच दिधेल निही. ढोकरी एकटीच कामाला गेल्ती. दिस बुडल्यावर ढोकरी कामावरशा आली ...आली त् पाटलाचा आगाऊ निरोप घेनच आली ... पाटलानं दोघाहो बाप–ल्योकाला रात्री कामाला वहारलाता. वाडीत गव्हाला पाणी देयाचा बेत व्हता. आवसचा अंधेर किट्ट असंल, तरी पाटलानं त्यावर उपाय सोदेल व्हता. गॅसबत्ती ...!

चैतीला राग येतो. ती सांगते, 'रात-दिस काम कराया आपु कायी ढोर निही. रातीचं कामाला जायाचा निही!'

पण तिला गप्प करत ढोकरा मनतो—'पोरीऽऽ तुला कायी समज निही. तू *उगीच न्हाऽ! मालकानं वहारला तर* जायाली पायजे!'

चैती मनातल्या मनात धुमसत उगीच न्हाते ... तिला आज चैत्या घरा पायजे व्हता. आज एक दिस घरा बसून कढ्हाडला ... *पण उद्या त्या दुष्टाच्या कामाला जाया* जीव घाबरवत व्हता. पुना त्येच्या कामाला जावं निही असं तिचं मन सांगत व्हतं. त्यासाठी काल रातीचा आती परसंग आज चैत्याला सांगायचा तिचा बेत व्हता. पणीक तिचा कायीच इलाज चाल निही ...

आज चैतीनं कव्हाच रांधला. कसा-बिसा धान् जेवून काठी संबाळत ढोकरा कामाला जाया निगला. चैत्याचा जायाचा बेत निही व्हता. पणीक ढोकऱ्यानं त्याला समज दिली. ना दोघाहो हारीच गेलं ...

... चैत्या रहाट हाकलत व्हता. ढोकरा पाणी सोडत व्हता. बत्तीच्या उजेडात पाटलाची वाडी उजळून निगलिती. आसपासच्या झाडावरल्या पाखरायची उजेडानं कव्हाच झोप उडलिती. रहाटाची टोनगं एकाच चाकोरीत गोल फिरत व्हते... चैत्या फिरत व्हता... त्याचं इचारचक्र फिरत व्हतं... 'टोनग्यागत आपलं औक्ष चाललंय... टोनगं रहाटचक्राला जुपेल हायेत ... तसं आपु गडीचक्राला जुपेल हावं...! मरताव खपाय लागलं. टोनग्यागत! टोनंग्यात न् आपल्यात काय फरक हाये ...? मालक देल तेवढा खायाचा ...मालक लावल ते काम करायचा ... पणीक टोनग्याचं एक बरं हाये... त्येनला मन निही का सवताचा इचार निही ... मुकी बिचारी! मणुन कशाची खंत हो निही ... मानसाला मन नसतं ... सवताचा इचार होता निही, तर बेस व्हता ... मालक आपली पिळवणूक करतो त्येची जाणीव तरी येती निही ...! गडीचक्रात अडकल्याची चीड मनाला झोंबती निही ... !!' रहाटचक्र फिरत व्हतं ... सुन्न मनानं चैत्या फिरत व्हता ... टोनग्याबरुबर! गडीचक्र फिरत व्हतं ... रात कनाकनानं पुढं सरकत व्हती ...

चैतीला निजच लाग निही. ती ओटीवर उगाच बसेल हाये. अंगणात खाटवर ढोकरी झोपेल हाये. दिसभर मरसारख काम करून लुंगलीतो! अंधाराची काळी घाबल बोंगडून आख्खा पाडा पहुडलाता. लोकाची एक निज झाली असल. घरातला दिवा विझत व्हता. तेल सपलं असंल. तवा चैती उठली. धावलीवर जान पसरली. दिवा विझलाता. बाहेरच्या अंधेरानं कवाच झोपडीत कब्जा केल्ता. पाड्यात एखादं कुत्र भोकाड वासुन इवळत व्हतं. त्या भेसूर आवाजानं रातर थरारत व्हती. चैतीचं काळीज धडधडत व्हतं. तिनं डोळं गच्च मिटलेत.

□

# शब्दस्फोट

## स्वातंत्र्याचा घोष करणारी कविता

'शब्दस्फोट' हा श्री. नारायण पेडणेकर यांचा कवितासंग्रह पेडणेकरांच्या विचारांची धग ह्या कवितामधल्या शब्दाशब्दातून व्यक्त होत आहे. ह्या दृष्टीने संग्रहाचे नावही अन्वर्थक असेच आहे. ह्या संग्रहाचा विचार करताना त्याला असलेला वातावरणाचा अटळ संदर्भ विसरता येत नाही, हे प्रथम लक्षात घेतलं पाहिजे.

आणीबाणीच्या अंधारयुगात स्वातंत्र्याचा घोष करणारी ही कविता आहे. दबलेल्या, घुसमटलेल्या माणसाचा स्वत्वभाव जागवण्यासाठी धडपडणारी, परिस्थितीचे निर्भय चित्रण करून आव्हाने देणारी नि आवाहन करणारी ही कविता आहे. पेडणेकराचेच शब्द वापरायचे झाले तर 'शब्द जगवताना नपुसक जमान्याचे भान प्रतोत करणारी ही कविता आहे.'

ह्या कवितेला साहित्यक्षेत्रात नवा प्रयोग करण्याचा ध्यास नाही. अभिव्यक्तीच्या सुभगसुदरतेने रसिकाना मोह घालण्याचा तिचा अट्टाहास नाही. मृदुमधुर शब्दार्थ तिच्या प्रकृतिधर्मात बसणारा नाही. कारण तिची सहजप्रवृत्ती पुरुषार्थानं पेटून उठावं अशी आहे. सामर्थ्यानं काही नवीन घडवावं अशी आहे. प्रचंड प्रक्षोभक वगैरे नेहमीच्या शब्दाना टाळायच म्हटल तर म्हणावं लागेल की, माणसामधल्या इच्छाशक्तीनं सळसळून उठाव, परिस्थितीचे लाचार पाश तोडावेत अन् माणुसकीवर प्रहार करणाऱ्या प्रत्येक अंधाराचा हृदयभेद करीत त्यान प्रखर सत्याला सामोरं जावं, ह्या प्रेरणेतून जन्मलेली ही कविता अभिव्यक्तीचा विचार मागे पडावा इतका जळजळीत आशय समोर मांडते.

ह्या कवितेला आपली दिशा ठाऊक आहे, आपलं प्रकाशमय सत्य कसं गवसेल ह्याची जाणीव आहे. त्यासाठी पावलोपावली झगडाव लागणार आहे. अन् तेही स्वतःशी, स्वतःच्याच जमान्याशी, हेही तिला माहीत आहे. वास्तवाचं दर्शन तिला अस्वस्थ करणारं आहे. सर्वत्र दाटून आलेली निराशा, अधिकाधिक लाचार बनलेला माणूस आणि मुकाट बसलेले शहाणपण ह्यानी तिच्या आंतरिक ऊर्मी उफाळून येतात. 'गाण्यासह टिपलेला पक्षी रक्ताच्या थारोळयात' किंवा

'बुभुक्षित अंधाराच्या धृतराष्ट्रमिठीत
तेजाची सावली थरथरतेय !'

असे नानाविध संदर्भ— कधी स्वत:चे सलते दु:ख सागणारे तर कधी आमच्या सर्वांच्यामधल्या एका निर्बल धृतराष्ट्राचा उपहास करणारे ! कधी ते एखाद्या शहाजादीची गोष्ट सांगू पहातात— अन्

शहाजादीला प्यारे आहेत असले
'खच्ची' लौडे
ते करणार नाहीत दरबारी कारस्थाने

किंवा

'आता घोषणा बंद, घाम गाळा...
ल लसणीतला, नव्हे लोकशाहीतला.
लोक संपले, शाही सुरू झाली !'

असे वास्तवाचे प्रतीकात्म दर्शन घडवतात! 'संगनमताच्या नि संग, नपुसक अंधारात सत्याच्या चोखाटण्या चालल्यायत्' हे डोळयाने पाहताना, 'भोगणाऱ्या, भोवडणाऱ्या, जंग जगून खंगलेल्या, भुखाळ भोगांनी वखवखलेल्या विटक्या रंगाच्या जगण्याची' तऱ्हा अनुभवताना ही कविता व्यथित होते; पण तिची जिद्द सपत नाही.

'मला कफल्लकाला आज
वाचा फुटली आहे ती—
भुकेच्या जयजयकारासाठी ।
आतड्याच्याच पिळाने
सत्तेच्या मुळाशी तरफ लागेल,
उभी सत्ता पालथी पडेल
ह्याच एका उदड विश्वासाने
मी माझा आवाज—
ह्या गडद अंधारात फेकला आहे.'

अशा आत्मविश्वासाने ती अधाराशी झगडते आहे. पेडणेकरांची कविता महाभारताचे संदर्भ जशी वारंवार देते तसेच पक्ष्याचे आणि रक्ताचेही. तसं म्हटलं तर पक्षी काय, रक्त काय, धृतराष्ट्र-गांधारी काय किंवा अंधार काय, हे सारे एकेका लौकिक सत्याचे प्रतीक म्हणून येतात आणि त्या सत्याशी माणसाला जोडणारे सारे दुवेही आपोआपच उलगडून जातात.

मग कधी त्या कवितेची सलती वेदना भूतकालीन घटनाशी समानतेची सूत्रे जोडू लागते तेव्हा 'सैबेरिया', 'नागासाकीचे रान मोकळे' किंवा 'हा राजकन्येचा रथ' अशा कविता जन्म घेतात. वर्तमानाची बोचरी जात कधी तिच्या तोंडून—

'काल एक महात्मा मेला
लोकांसाठी लढणारा
लढता लढता तो महात्मा
लोकांसाठी मेला
हे लोकांना ठाउक नसावे हा
लोकधर्म आहे
...महात्मा मेला याची दखल राजानेही
घेतली नाही
हा राजधर्म आहे.'

असे प्रखर सत्य वदवते, तर कधी

'आम्ही जगण्यास सवकलो, आम्ही मरणाते भ्यालो' असेही !

'मी शाहीर भुकेचा, जाहीर बंड करतो' असं गरजणारे पेडणेकर आणि त्यांनी शब्दांमागे उभी केलेली त्यांची सारी आवाहक विचारशक्ती ह्यांचे मोल परिस्थितीच्या संदर्भात आणि सदर्भ बदलले तरी मोठे आहे हे खास ! कलात्मकतेच्या दृष्टीने तिच्याकडे फारसे लक्ष पुरवलेले दिसत नाही. तिचा मुक्त आविष्कारच कधी ओवी—अभंगाच्या थाटात तर कधी वेगुमानपणे होताना दिसतो. 'हे बेहोश गाणे भळभळत्या उरातून वहात आलेले आहे.' म्हणून त्याचे मोल मोजायला हवे,

'पाप पचले रातीला,
दिसा पुण्य ओकतोय'
'सरतच नाही, सलत राहते,
तिलाच म्हणतात रात'
किंवा 'शब्दा नुरे अर्थभान'
अशा सत्यदर्शी आशयाच्या संदर्भातच !

—अरुणा ढेरे

# आमचे ग्रंथालय

## Spandau

**The Secret Diaries-by Albert Speer**

**( Pocket Books, Pages 514**
**Price : Rs. 22/– approx. )**

बॉरमन, हिमलर, गोअरिंग किंवा स्पिअर यांच्याकडून ऑर्डर्स आल्या की, त्या हिटलरकडूनच आल्या, इतका मान जर्मन अधिकारी या चौघांना देत असत. मार्टिन बॉरमनविषयी मी याआधी 'माणूस'मध्ये 'Aftermath' या लॅडिस्लाव्ह फॅरागोच्या पुस्तकाचा परिचय करून देताना लिहिलंच आहे.

हिटलर व त्याचे वरील चौघे हस्तक यांविषयी इतकी पुस्तकं निघत आहेत की, न संपणारा हा विषय आहे, असंच वाटतं. परवाच एका दुकानात टॉलन्डने हिटलरविषयी लिहिलेला एक प्रचंड ग्रंथ पाहिला. यात म्हणे हिटलरविषयी बऱ्याच अप्रसिद्ध, अज्ञात गोष्टी आहेत. एका वेगळ्याच दृष्टिकोनातून हिटलरविषयी हा ग्रंथ लिहिला आहे.

खरं वाटत नाही; पण अगदी अलीकडे जर्मनीमध्ये हिटलर-लाट उसळली होती. हिटलरला अगदी 'हीरो' केला होता. 'बऱ्याच लोकांचा हिटलर हा 'हीरो' आहे; पण मी जेव्हा जेव्हा हिटलरने किती हिंसा केली, किती भयानक कृत्ये केली त्यांचे फोटो बघतो किंवा वर्णनं वाचतो तेव्हा या मनुष्याविषयी काही लोकांना इतकं कौतुक का वाटतं, ते कळत नाही. या लोकांचं कौतुक म्हणजे हिंसा हा मानवाचा atavistic trait आहे, याची ग्वाहीच ! अगदी शेवटपर्यंत मानवाचा हा गुणधर्म काही केल्या जाणार नाही, असं वाटतं.

परवा आमच्या वाचनालयातील एका वाचकानं मला सांगितलं की, स्पिअरच्या या डायरीत उत्तमोत्तम साहित्यिकांचा उल्लेख आहे. त्यात सिगमंड फ्रॉइड, थिओडोर ड्रेसियर, कार्लाइल, चेस्टरटन, जॅन कॉक्ट, चार्लस् डिकन्स, डोस्टॉव्हस्की, एरिक फ्रॉम, गटे, मोपासा, ऑगस्ट स्ट्रींडबर्ग, हेन्री जेम्स, मॅक्झिम गॉर्की, फ्रान्स काफ्का, थॉमस मॅन याचा उल्लेख आहे. मला आश्चर्य वाटलं, ज्या माणसानं हिटलरच्या हाताखाली एवढी दुष्कृत्ये केली, त्यानं एवढं उत्तम साहित्य वाचलं ! असं साहित्य वाचूनही त्यानं आपले हात रक्तानं माखविले तरी कसे ? मी कुतूहलानेच 'स्पॅन्डा' वाचायला सुरुवात केली.

'स्पॅन्डा' हे जर्मनीमधील 'स्प्री' व 'हॅवल' नदीच्या जवळचे शहर आहे. तिकडे पोलाद व इलेक्ट्रिक सामान बनविले जाते. एकोणिसाव्या शतकात तिथल्या किल्ल्यात राजकीय कैद्यांना ठेवलं जात असे. 'स्पॅन्डा टाउन लायब्ररी' मध्ये चाळीस हजार पुस्तकं आहेत. अल्बर्ट स्पिअरला कैदेत वाचायला भरपूर वेळ मिळत असे. ज्याँ पॉल सार्त्र स्पिअरने वाचला व त्याने लगेच कबूल करून टाकलं की,'सार्त्र त्याच्या डोक्यावरून गेला !' तसा तो बऱ्याच लोकांच्या डोक्यावरून जातो म्हणा ! पण सार्त्रबरोबर बरेच साहित्यिक स्पिअरच्या डोक्यावरून गेलेले दिसतात. कारण त्याच्या डायरीमधे ज्या मातब्बर साहित्यिकांचा उल्लेख आहे तो केवळ नावापुरताच ! कोणत्याच साहित्यिकांच्या वैशिष्ट्याचा, विषयाचा किंवा कॅनव्हासचा कुठेच मागमूस नाही. अर्थात युद्धाविषयीच्या पुस्तकात साहित्याची चर्चा करणे योग्य नव्हे; पण माणसाने चांगले साहित्य वाचलं की, त्याचा ठसा प्रत्येक गोष्टीवर उमटतो. तो इथे नाही. लेखनशैलीत नाही, विचाराच्या आवाक्यातही नाही.

स्पिअरची डायरी वाचली की, आणखी एक गोष्ट आपल्या मनावर बिंबते. ती ही की, त्याला त्याच्या कुटुंबाचा अतिशय लळा होता. ( फक्त इतरांची कुटुंबं बेचिराख करताना त्याला काहीच वाटलं नाही ! ) या डायरीत कधी कधी मात्र स्पिअर अंतर्मुख झालेला आढळतो. एके ठिकाणी तो लिहितो, 'मला २० वर्षे तुरुंगात डांबण्यात आलं. आता माझ्यात चांगलं काय उरलंय ? तुरुंगातून सुटल्यावर घरी गेलो तरी तिकडे एखादा परका माणूस आल्यासारखं त्यांना वाटेल !'

अलीकडे एक 'Hitler's War' हे पुस्तक बाजारात आलं आहे. हे पुस्तक एका revisionist ब्रिटिश लेखकानं लिहिलं आहे. त्याचं नाव डेव्हिड आयर्विंग. या पुस्तकात हा लेखक चक्क म्हणतो की, हिटलरनं ज्यूंचं हत्याकांड करण्यासाठी हुकूम दिलेच नव्हते ! या बाबतीत अल्बर्ट स्पिअरला एका पत्रकारानं त्याचं मत विचारलं, तेव्हा स्पिअरनं त्याला सांगितलं की, 'ज्यू लोकांच अस्तित्व जगाच्या पाठीवरून पुसून टाकावं, हा हिटलरच्या धोरणाचा गाभाच होता. त्यामुळे डेव्हिड आयर्विंगच्या पुस्तकातल्या ह्या विधानात अजीबात तथ्य नाही.' या पत्रकारानं स्पिअरला असंही विचारलं की, 'हिटलर हुकूम सोडत असे, त्याची बरीचशी कागदपत्रं सापडत नाहीत, ते का ?' 'हिटलर बहुतेक हुकूम तोंडीच सोडत असे. बॉरमन, हिमलर, गोअरिंग किंवा मी लेखी हुकूम सोडला तर तो सर्वांना शिरोमान्य करावा लागे. अर्थात आमचे हे लेखी हुकूम हिटलरच्या तोंडी हुकुमावरच आधारलेले होते.' असं स्पिअरनं त्याला उत्तर दिलं.

पहिल्या वर्षात तुरुंगातल्या जीवनाशी जुळवून कसे घेतो, याचे वर्णन स्पिअर करतो. सुरुवातीला तो म्हणतो की, 'मला तुरुंगात सात हजार तीनशे दिवस आणि लीप इयरचे पाच दिवस काढायचे आहेत. एक लांबच लांब न संपणाऱ्या बोगद्यात मी शिरतो आहे, असं मला वाटतंय.' कुठं जागा साफ कर, झाडू मार, हळूहळू वाचनाची भूक वाढव, असं त्याचं पहिलं वर्ष गेलं.

पहिल्या वर्षी ता. १–१२–१९४६ रोजी स्पिअरनं डायरीत नोंद केली आहे की, खटल्यात त्यानं अशी साक्ष दिली की, 'ज्यू लोकांच्या हत्याकांडाबद्दल त्याला काही माहीत नाही !'

डायरीतल्या काही काही नोंदी तर अगदी सामान्य व क्षुल्लक वाटतात. उदा.– २२–१२–१९४६ची नोंद–'थंडी फार कडाक्याची होती. मी माझ्याभोवती पांघरूण गुंडाळून झोपी गेलो.' एवढीच काय ती नोंद आहे. या पुस्तकात स्पिअरची व इतर व्यक्तींची फोटोंनी भरलेली बत्तीस पानं आहेत. हे फोटोसुद्धा विशेष लक्ष वेधून घेणारे नाहीत. कधी डायरीची नोंद अगदी लहान तर कधी एकदम मोठी आहे. त्यामुळे कैद्याच्या व्यक्तिमत्त्वावरून व स्पिअरवरून एक प्रकारचा प्रकाशझोत फिरत आहे, असं वाटतं. एकंदरीत स्पिअरची ही डायरी कधी असंबद्ध व तुटक वाटते. काही बाबतीत मात्र ती नवीन प्रकाश टाकते.

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी



मी नेहमीच कुटुंब नियोजनाचा पुरस्कर्ता होतो आणि देशात अनेक व्यासपीठांवरून आणि वर्तमानपत्रांतून मी या कार्यक्रमाला माझा सतत जाहीर पाठिंबाच दिला आहे. आपल्या देशात सर्वांगीण प्रगतीसाठी आणि समृद्धीसाठी, कुटुंब नियोजन एक महत्त्वाचा आणि आवश्यक कार्यक्रम आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. या संबंधात माझी एकच अट असून त्याचा मी पुनरुच्चार करून असेच म्हणेन की, हा कार्यक्रम कार्यान्वित करण्यात कोणत्याही प्रकारची सक्ती करण्यात येऊ नये. माझ्या स्वतःच्या अनुभवाने मी असे म्हणू शकतो की, ग्रामीण क्षेत्रात सामान्य लोकांनी पण कुटुंब नियोजनाची आवश्यकता ओळखली आहे. पण राज्य अथवा स्वयंस्फूर्त संस्थांना त्यांची ही गरज पुरविणे शक्य झाले आहे, असे मला वाटत नाही. आता या बाबतीत प्रचार आणि लोकांना शिक्षण देण्याची कमी गरज असून, अधिक आवश्यक वैद्यकीय सोयी-सवलती पुरविण्याची गरज आहे. आजही ग्रामीण वैद्यकीय रुग्णालये अथवा आरोग्य केन्द्रे हे कार्य पार पाडण्याच्या दृष्टीने सुसज्ज आहेत, असे मला वाटत नाही. म्हणूनच केवळ प्रचारावर भर देण्याऐवजी, ही गरज पुरविण्याकडे अधिक लक्ष पुरविण्यात आले पाहिजे, असे मला वाटते.

**— जयप्रकाश नारायण**

davp 77/276

वैज्ञानिक दृष्ट्या राष्ट्र जितके प्रगत तितके भेसळ-बनवाबनवीचे मार्ग अधिक शास्त्रशुद्ध

# वैज्ञानिक संशोधनामधील भेसळ

डॉ. र. वि. रानडे

विज्ञानक्षेत्रात सर्वत्र नेत्रदीपक प्रगती चालू आहे. पूर्वीच्या काळी समर्थ व्यक्तीचा समाजावर प्रभाव असे, त्यानुसार शकराचार्यांचे युग, ज्ञानेश्वरांचा काल, शिवाजीचे युग, टिळकांचा कालखंड, महात्मा गांधींचे युग, असे कालखड आपण मानत होतो. उच्च नैतिक मूल्ये आणि आदर्श वैचारिक परंपरा यांचा आदर करण्यासाठी त्या त्या काळाशी निगडीत असलेल्या व्यक्तिमत्त्वांचे स्मरण आपण अशा प्रकारे ठेवीत होतो; पण विज्ञानाची घोडदौड सुरू झाली, समाजांचे आधुनिकीकरण झाले, त्याबरोबर नैतिक विचार ढासळू लागले. अणुस्फोटानंतर अणुयुग आले, जेट विमानांनी वेगवान जेटयुग सुरू केले, चंद्रावर स्वारी करून अवकाशयुग अवतरले आणि त्या पाठोपाठ आले आहे भेसळीचे युग. मानवाच्या विचारयंत्रणेतच भेसळ शिरली, त्यामुळे ती आचरणातही आली. वागणुकीत भेसळ आली, बोलण्यात आली, निसर्गाने निर्माण केलेल्या धान्य, दूध या अन्नपदार्थांत ती आली, तसेच व्यवसाय–व्यवहारातही ती घुसली. मग तो शिक्षकाचा पेशा असो, वैद्यकीय व्यवसाय असो किंवा वैज्ञानिक सशोधन असो.

विशेष व्यवसायामधील भेसळ शोधून काढणे सामान्य माणसाला कठीणच असते. म्हणूनच तर सरकारी यंत्रणेमार्फत आणि ग्राहक पंचायतीकडून भेसळीचा शोध घेण्याच्या साध्या–सोप्या परीक्षा सर्वांच्या सोयीसाठी जाहीर केल्या जातात आणि त्याहूनही शका आली तर, भेसळ प्रतिबधक खात्याकडे नमूना पाठविण्याबद्दल आवाहन करण्यात येते. पदार्थांमधील भेसळ शोधून काढण्याचे हे मार्ग निश्चितच उपयुक्त आहेत; परंतु त्यामागे जी मनोवृत्ती, जी बुद्धिमत्ता आहे, तिच्यातील भेसळ शोधून काढण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात जागरूक, न्यायी आणि नीतिमान नागरिक हवेत, तरच समाजाची हानी टळू शकेल. रासायनिक आणि अन्य परीक्षांनी पदार्थांमधील भेसळ समजू शकते. दुधात पाणी घातले आहे का, रॉकेलमध्ये चोरीचे डिझेल मिसळले आहे का ? तांदुळात गारेचे खडे घातले आहेत का ? किंवा कुटलेल्या सुपारीत लाकडाचा भुस्सा मिसळला आहे का ? हे एक वेळ चटकन् समजू शकते; पण सीमेंटमध्ये दगडाची भुकटी मिसळल्यावर, त्याचा वापर करून बांधलेले घर किंवा पूल कोसळून जीवितहानी झाली की मग समजून येते. भेसळयुक्त औषधे वापरल्याने जीव वाचवायच्या ऐवजी तो गमावण्याची वेळ येते, तेव्हा औषध घेणाऱ्याचे डोळे मिटतात आणि इतरांचे डोळे उघडतात.

हीच भेसळीची, फसवाफसवीची प्रवृत्ती ज्ञानदान आणि ज्ञानसंपादन या पवित्र क्षेत्रांमध्येही घुसली आहे, हे आपले दुर्दैव. शिक्षकाने स्वतः कष्टपूर्वक अभ्यास केलेला नसतो, त्यामुळे तो खरे–खोटे भेसळयुक्त ज्ञान आपल्या विद्यार्थ्यांना देतो. मग त्यांना परीक्षेतून पार पाडण्यासाठी खऱ्या कमी मार्कांत खोट्या अधिक मार्कांची भेसळ करून त्यांना एकदम 'हुषार' विद्यार्थी बनवितो. ज्या इंजेक्शनच्या पावडरीत एक सी. सी. पाणी घालावयाचे त्यात पाच सी. सी. पाणी मिसळून त्यातून अधिक पैसा मिळवणारा डॉक्टर हा दुधात पाणी घालणाऱ्या गवळ्यापेक्षा फारसा भिन्न नाही. उलट, परिणामांचा विचार केला तर डॉक्टर समाजाचा अधिक मोठा गुन्हा करीत असतो. दारू तयार करण्यासारखा मूळात नीतिबाह्य व्यवसाय; त्या दारूत विषारी पदार्थांची भेसळ करून व्यसनाधीनांना कायमची झीग आणणारे खोपडीवाले हे तर समाजाच्या शत्रूच्या पलीकडचे वाईट लोक म्हणावयास पाहिजेत.

ही भेसळीची प्रवृत्ती शोधून काढण्यासाठी आपण सदैव जागरूक राहिले पाहिजे. वृत्तपत्रे आणि नियतकालिके हे कार्य सतत करीत असतातच; पण विशिष्ट व्यावसायिक क्षेत्रांमधील अनीतीला वाचा फोडण्याचे अवघड काम त्याच क्षेत्रातील निर्भिड नागरिकांनी करणे आवश्यक असते. डॉक्टराच्या व्यावसायिक नीतिबद्दल डॉ. अनिल अवचट यानी आपले परखड विचार व अनुभव समाजापुढे ठेवून या बाबतीत एक मोठा आदर्श निर्माण केला आहे. दुर्दैवाने वैज्ञानिक संशोधनाच्या क्षेत्रातही आज–काल कळकळीच्या संशोधकाबरोबर वाघाचे कातडे पाघरलेले काही चतुर शोधक शिरलेले आहेत. विज्ञान आणि संशोधन यात काहीच गम्य नसलेल्याना याचा थागपत्ताही नसतो; परतु सरकारी किंवा अन्य सार्वजनिक द्रव्याच्या सहाय्याने असे 'बोगस' सशोधनकार्य करून जनतेच्या आणि तज्ज्ञाच्याही डोळ्यात धूळ फेकणाऱ्याचा सुळसुळाट हल्ली वाढू लागला आहे. सरकारदबारी वजन असल्यामुळे त्याच्या विरुद्ध ब्र काढण्याचीही त्याच्या कनिष्ठाची टाप नसते. ही मडळी भरघोस अनुदाने मिळवितच असतात आणि मोठाल्या मानाच्या व जबाबदारीच्या जागा भूषवीत असतात. मध्यतरी महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठातील तादुळाच्या जातीचे सशोधन फोल ठरल्याचे वृत्त आले होते; पण पुढे त्याबाबत काय कारवाई करण्यात आली ते समजले नाही.

सर्व सरकारी व बिनसरकारी वैद्यकीय, शेतकी, स्थापत्यविषयक आणि अन्य तांत्रिक महाविद्यालयामध्ये अध्यापनाचे काम करणाऱ्या

सर्वांनी त्या त्या शास्त्रीय विषयात काही तरी संशोधनकार्य करावे, अशी अपेक्षा असते. वरिष्ठांचे तसे फतवेही अधून मधून येत असतात. पण अशा प्रकारचे उपयुक्त कार्य होणे हे केवळ संस्थाप्रमुख व विभागप्रमुखावर अवलंबून असते. ते बिचारे व्यवस्थापकीय व कारकुनी कामांत इतके गढून गेलेले असतात की, नेहमीचे शिकविण्याचे कामही त्यांच्या हातून धड होऊ शकत नाही. बरे, एखादा उत्साही, कळकळीचा संशोधन वृत्तीचा प्रमुख असला, तर त्याला मदत करणारे कनिष्ठ शिक्षक बहुतेक वेळा पोटार्थी असतात, त्यांना या कामात अजिबात रस नसतो. ते जेमतेम शिकविण्याचे काम उरकून फावल्या वेळात कथा-कादबऱ्या तरी वाचतात, किंवा शिक्षिका लोकरीचे विणकाम करण्यात दंग असतात. अशाच प्रकारे उच्च अभ्यास किंवा संशोधनाची अपेक्षा साध्या शास्त्रीय व कला महाविद्यालयामधील सर्व शिक्षकांकडूनही असते. पण पूर्ण वेळ नेमणूक असलेले प्राध्यापकसुद्धा आपल्या शिकविण्याच्या तासापुरतेच कॉलेजात जात असतात आणि उरलेला वेळ घरी किंवा अन्य कामासाठी खर्च करतात. रिकामा सर्व वेळ ग्रंथालयात आपल्या विषयाचे वाचन-मनन त्यांचे हातून होत नसल्यामुळे या सर्व मंडळींच्या शिकविण्यामध्ये भरपूर भेसळ असतेच. शिक्षणाचा दर्जा सार्वत्रिकरीत्या खालावण्याची जी अनेक कारणे आहेत, त्यापैकी हे एक प्रमुख आहे. सामान्य जनांना शिक्षकांच्या या पूर्ण कर्तव्याची काहीच जाणीव नसते. त्यामुळे बदलत्या शिक्षणक्रमांवर विद्यार्थ्यांच्या अपयशाचे खापर फोडून ते मोकळे होतात, 'माझे या टर्मचे वेळापत्रक इतके छान जमले आहे की, मला चार दिवस तीन-तीन तास आहेत, आणि दोन दिवस पूर्ण मोकळे आहेत, त्या वेळी आपल्याला पत्त्यांचा अड्डा टाकता येईल,' असे सांगणाऱ्या प्राध्यापक मित्राकडे ते आदरमिश्रित कौतुकाने पहात असतात.

वैज्ञानिक संशोधनही आजच्या प्रगतीशील जगाची एक महत्त्वाची गरज आहे. शास्त्रीय संशोधनात पाश्चात्त्य देश आघाडीवर आहेत. पदार्थ-विज्ञान, रसायन आणि वैद्यक या क्षेत्रात थक्क करून सोडणारे नवनवीन शोध ते रोज लावत आहेत आणि खिशाला परवडेल, त्यानुसार आपण ते आयात करीत आहोत. अमेरिकेने गेल्या वर्षी शास्त्रीय संशोधनातील सर्व नोबेल पारितोषिके मिळविली; आपल्या देशात मात्र सर जगदीशचंद्र बोस आणि सी. व्ही. रमण याच्यानंतर त्या तोलाचा कोणीच शास्त्रज्ञ निपजला नाही. डॉ. खोराणा येथे जन्मले, पण त्यांनी महत्त्वाचे काम केले अमेरिकेत. उदासीनता आणि भेसळीचे राजकारण यामुळे आपल्याकडील बुद्धिमान लोक येथेच कुजतात, किंवा परदेशात जाऊन नशीब काढतात. पाश्चात्त्यांनी विमानाचा, अणुस्फोटाचा किंवा अवकाश प्रवासाचा शोध लावला लावला की, आमच्या पूर्वजांना पुराणकालात या सर्व विद्या अवगत होत्या, म्हणून आपण शेखी मिरवतो. पाश्चात्त्य पद्धतीच्या आधुनिक औषधाचे कडक दुष्परिणाम दिसू लागले म्हणजे आपला आयुर्वेद किती शास्त्रशुद्ध आणि उपकारक आहे, याची आपणास आठवण होऊ लागते. पण या प्राचीन विद्या-कलांचे वाचन व संशोधन करण्याची जिज्ञासा आज फारच थोड्या बुद्धिमान तरुणांमध्ये दिसते. दुर्दैवाने अशी इच्छा उत्पन्न करण्याचे एक महत्त्वाचे साधन म्हणजे संस्कृत भाषा. पण आज तिचेच अभ्यासक्रमातून समूळ उच्चाटन करून शिक्षणतज्ज्ञांनी आपल्या अस्मितेचा तोही एक पंख कापून टाकला आहे.

राष्ट्र वैज्ञानिक दृष्टीने जितके अधिक प्रगत तितके तेथील बनवाबनवीचे मार्ग अधिक शास्त्रशुद्ध. आकडेमोड आणि विचार करण्याचा डोक्याचा ताप कमी करण्यासाठी यांत्रिक मेंदू किंवा कॉम्प्युटरचा शोध लागला. पण आता त्याच्याच सहाय्याने लाखो डॉलर्सची फसवणूक करणारे भेसळ-बुद्धीचे चतुर लोक निपजले आहेत. कॅन्सर या रोगाची कोणाला भीति वाटत नाही? त्या भीतीच्या पोटी या रोगाचे मूळ शोधून काढण्यासाठी आणि त्यावरून त्या रोगासाठी परिणामकारक उपचार शोधण्यासाठी जगात स्वतंत्र संशोधन चालू आहे. अमेरिका या क्षेत्रात आघाडीवर आहे. कोट्यावधी डॉलर्स या कामासाठी तेथे खर्च होत आहेत. न्यूयॉर्कमधील स्लोन केटरिंग इन्स्टिट्यूट ही कॅन्सरवर संशोधन करणारी अमेरिकेतील सर्वात मोठी संस्था. या संस्थेला एवढे महत्त्व आहे की, त्याचे संचालक हे अमेरिकेच्या अध्यक्षांचे कॅन्सरविरोधी सरकारी कार्यक्रमाबद्दलचे एक सल्लागार असतात. त्यामुळे या संस्थेमध्ये कॅन्सरवरील अतिशय प्रगत संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांची नेमणूक करण्याची प्रथा आहे.

डॉ. विल्यम समरलिन हे अमेरिकेतील एक निष्णात त्वचारोगतज्ज्ञ. आज-काल त्वचारोगांमध्ये ॲलर्जीचे फार महत्त्व आहे. ॲलर्जी म्हणजे शरीराची तीव्र संवेदनशीलता. या गुणधर्मामुळे, विशिष्ट पदार्थांशी संपर्क आल्यावर, त्वचेवर पुरळ किंवा इसब उठते. शरीराला परकीय असणारी प्रथिने, तसेच प्लॅस्टिक, नायलॉन पेनिसिलीनसारखी औषधे, आहारातील अंडी, मासे इत्यादी पदार्थ, कीटकांचा दंश, हवेतील बदल, अशा अनेक कारणांनी काही व्यक्तींच्या शरीरामध्ये एक प्रतिक्रिया किंवा रिॲक्शन घडते, ती त्वचेवर पुरळाच्या रूपाने दिसून येते. शरीराचा स्वसंरक्षणाचा हा एक भाग असतो. परकीय कणांना नष्ट करण्यासाठी शरीरात प्रतिबंधक शक्ती निर्माण होते, तिची प्रतिक्रिया आपणास दिसून येते. शरीरात प्रवेश करणाऱ्या जंतूंविरुद्धसुद्धा अशी प्रतिबंधक द्रव्ये निर्माण होतात. साथीच्या रोगाची लस आपण टोचून घेतो. तेव्हा अशीच प्रतिकारशक्ती निर्माण होत असते. या शास्त्राला इम्युनॉलॉजी असे म्हणतात, तर या प्रतिकारशक्तीला इम्युनिटी म्हणतात. कॅन्सर-सारखा रोग या तत्त्वाचा उपयोग करून आटोक्यात ठेवता येईल असे त्या क्षेत्रातील तज्ज्ञांना वाटते. त्यामुळे या विषयाला वैद्यकीय संशोधनात आज फार महत्त्व आले आहे. त्वचारोगशास्त्राला हे शास्त्र साहजिकच फार जवळचे असल्याने डॉ. समरलिन हळूहळू या शाखेकडे आकर्षित झाले. त्यांच्या संशोधनाचे महत्त्व ओळखून डॉ. रॉबर्ट गुड या स्लोन केटरिंग संस्थेच्या प्रमुखांनी त्यांना आपल्याकडे पाचारण केले आणि अनेक जुन्या संशोधकांची ज्येष्ठता डावलून त्यांना एका संशोधनशाखेचे प्रमुखपद दिले.

एखाद्या व्यक्तीच्या किंवा प्राण्याच्या त्वचेवर त्याच जातीच्या दुसऱ्या प्राण्याच्या त्वचेचे कलम केले तर ती परकीय त्वचा नष्ट करून फेकून देण्याची शरीराची प्रवृत्ती असते. शरीरातील नैसर्गिकरित्या निर्माण होणारी प्रतिकारशक्तीच हे काम करते. हृदय, मूत्रपिंड, इत्यादी अवयवांचे कलम केल्यानंतर सुद्धा ते नष्ट करण्याकडे शरीराची प्रवृत्ती असते. ही प्रतिकारशक्ती दबविण्यासाठी काही

औषधे सतत देऊन हे अवयव टिकून राहण्याचे प्रयत्न केले जातात. अशा अवयवाचे कलम करताना संबधित दोन्ही व्यक्तींच्या रक्ताचे गट आणि इतर पेशींचे गुणधर्म यांमध्ये अधिकातअधिक साम्य आहे का, याची खात्री करून घेतात, म्हणजे कलम केलेल्या अवयवाला होणारा प्रतिकार मुळातच सौम्य राहतो. इम्युनॉलॉजीच्या दृष्टिकोनातून अशा प्रकारचे साम्य एकाच कुटुंबातील जवळच्या नातेवाईकात दिसून येते. जुळ्या भावंडांचे अवयव एकमेकांच्या शरीरात कलम करण्याचे काम या दृष्टीने सर्वात सोपे आहे. बर्नेट आणि मेडावर या शास्त्रज्ञानी या विषयात एक क्रांतिकारक शोध लावला, त्याबद्दल त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले. एकादा प्राणी, उदाहरणार्थ उंदीर, गर्भावस्थेत असताना, त्याला दुसऱ्या उंदराच्या पेशींचे इंजेक्शन दिले तर जन्मानंतर केव्हाही त्या दुसऱ्या उंदराच्या अवयवाचे कलम तो यशस्वीरीत्या टिकवून धरू शकतो. गर्भावस्थेतच त्या परकीय पेशींची ओळख झाल्यामुळे परस्परातील दुजाभाव नष्ट होतो व प्रतिबंधकशक्ती निर्माण होत नाही. या तत्त्वाच्या आधाराने पांढऱ्या उदराच्या पिलांवर काळ्या उंदराच्या त्वचेचे कलम त्यांनी करून दाखविले. शरीरातील प्रतिबंधकशक्ती किंवा इम्युनिटीचा उपयोग करून कॅन्सरवर यशस्वी उपाय शोधता येईल अशी गेल्या काही वर्षांत शास्त्रज्ञाना कल्पना आली; त्यामुळे इम्युनॉलॉजीमधील संशोधनास फार महत्त्व प्राप्त झाले. डॉ. समरलिन यांनी तो धागा बरोबर पकडला आणि बर्नेट आणि मेडावर यांच्या सिद्धान्तावर ते अधिक संशोधन करू लागले. त्यानी काही प्रयोगावरून एक मोठे आकर्षक विधान मांडले. कोणत्याही प्राण्याची त्वचा किंवा अवयवाचा तुकडा एका विशिष्ट रसायनाच्या मिश्रणात ठेवून त्याच्या पेशींची जोपासना केली, म्हणजे त्या पेशींचे ' कल्चर ' केले, तर तो तुकडा दुसऱ्या कोणत्याही प्राण्याच्या शरीरात यशस्वीरीत्या कलम करता येतो, असा शोध त्यांनी लावला होता. नैसर्गिक प्रतिबंधक शक्तीवर मात करणारा हा शोध सर्वांनाच मोठा क्रांतिकारक वाटला असल्यास नवल नाही. डॉ. समरलिन यांनी आपल्या अभिनव तंत्राने पांढऱ्या उंदराच्या शरीरावर काळ्या उंदराच्या त्वचेचे कलम यशस्वीपणे करून दाखविले. बर्नेट आणि मेडावर यांच्या सिद्धान्तापेक्षाही अधिक प्रगत आणि अधिक आकर्षक असा हा प्रयोग होता; पण हाय रे दैवा ! एके दिवशी प्रयोगशाळेत ते काम करीत असताना त्यांच्याच एका कनिष्ठ सहकाऱ्याने त्याना पकडले. प्रयोगातील काही पांढऱ्या उंदराच्या त्वचेवर समरलिनसाहेब ब्रशाने काळा रंग लावत होते. म्हणजे पांढऱ्या उदरावर काळ्या त्वचेच्या कलमाचा नुसता आभास ते उत्पन्न करीत होते, हे उघड झाले. मग त्यांचा तो महान अभिनव प्रयोग वगैरे सगळ्या गप्पाच होत्या तर ! मोठ्या चतुराईने संशोधकाचे नाटक ते पार पाडीत होते. दीर्घकाळ आपली संशोधनातील आणि नोकरीतील ज्येष्ठता डावलली गेल्यामुळे त्या प्रयोगशाळेतील काही शास्त्रज्ञ अस्वस्थ होतेच. डॉ समरलिन यांच्या या नव्या प्रयोगाबद्दल त्याना संशयपूर्ण कुतूहल होते. त्यामुळं त्यांनी समरलिन यांच्यावर गुपचूप नजर ठेवली आणि १९७४ मध्ये एक दिवस त्यांचं बिंग बाहेर काढलं. शास्त्रीय जगाच्या दृष्टीने ही गोष्ट फारच चांगली झाली. नाही तर पुढेमागे त्यांना एखादे वेळी नोबेल पारितोषिकसुद्धा मिळून गेलं असतं.

तावडतोब या प्रकरणाची अधिकृत चौकशी सुरू झाली. त्यामध्ये अनेक महत्त्वाच्या गोष्टी उजेडात आल्या. समरलिन यांनी याच सिद्धांताच्या स्पष्टीकरणासाठी ससाच्या डोळ्यांवरील कलमाचे प्रयोग दाखविले होते. सशांच्या डोळ्यांवर दुसऱ्या सशाचे ( कॉर्नियाचे ) कलम यशस्वीपणे करण्याचे हे प्रयोग होते; पण ते निव्वळ जादूचे किंवा हातचलाखीचेच ठरले. कारण त्यांच्या संशोधन संस्थेतील अनेक अभ्यास-परिषदांमध्ये या यशस्वी 'प्रयोगातील' म्हणून जे ससे त्यानी वेळोवेळी दाखविले होते, त्यांच्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया किंवा इतर कोणताच प्रयोग कधीही केलेलाच नव्हता. एकदा प्रकरण बाहेर येताच डॉक्टरमहाशयांच्या अगदी विश्वासातील प्रयोग-साहाय्यकही बोलके झाले आणि सर्व सत्य जगापुढे आले.

डॉ. समरलिन यांचा एक विशेष म्हणजे ते आपले संशोधनकार्य शास्त्रीय नियतकालिकाना निबंधरूपाने क्वचितच प्रसिद्ध करीत असत. त्यांचा विशेष भर सामान्यजनांपर्यंत पोहोचणाऱ्या वृत्तपत्रावर आणि सनसनाटी नियतकालिकांवरच होता. त्यामुळे थोड्याच काळात ते फार लोकप्रिय झाले होते. आपल्याकडे सुद्धा अनेक थोर डॉक्टर्स याच मार्गाचा अवलंब करून लोकप्रियतेचे शिखर गाठून भरघोस व्यावसायिक यश मिळवितात; पण ते वैद्यकीय व्यवसायातील नीतिमत्तेला धरून नाही. सुदैवाने डॉ. समरलिन यांचे रोज कौतुक करणाऱ्या वृत्तपत्रानी आणि रेडिओ-केंद्रांनी त्यांच्या या नव्या कर्तृत्वालाही तशीच जोरदार प्रसिद्धी दिली आणि त्याना मोठ्याच अडचणीत टाकले.

हे प्रकरण काही सामान्य नव्हते. त्यामुळे ' इंद्राय तक्षकाय च ' या नियमाने या स्वाहाकारात स्लोन-केटरिंग संशोधन संस्थेचे संचालक डॉ. रॉबर्ट गुड यांच्यावरही अमेरिकेतील वृत्तपत्रानी टीकास्त्र उपसले. त्याबरोबर समरलिनसाहेबाना स्वसंरक्षणासाठी एक मुद्दा गवसला. ' आपल्या संस्थेतून काही तरी नवे बहुमोल संशोधन झालेच पाहिजे, असा संचालक डॉ. गुड यानी सतत लकडा लावला होता, त्यामुळे आपण मोहाला बळी पडून खोटे संशोधनकार्य शास्त्रीय जगापुढे मांडले ', असा पवित्रा त्यानी घेतला. आपल्या संस्थेचे महत्त्व कायम टिकावे, भरघोस सरकारी अनुदानाचा ओघ आपल्याकडे वळावा आणि अमेरिकेच्या शास्त्रीय ध्येयधोरणांमधील आपले स्थान कमी होऊ नये, याच हेतूने संचालकांनी ही मागणी केलेली असणार; पण त्याचा अर्थ खोटानाटा संशोधन-अहवाल सादर करावा असा नव्हे. संचालक डॉ. गुड हे व्यक्तिशः डॉ. समरलिन यांच्या प्रयोग-संशोधनात सहभागी नव्हते. इतकेच नव्हे तर, समरलिन यांच्या कामाच्या खरेपणाबद्दल गेले काही दिवस आपणाला शंकाच येत होती, अशी स्वच्छ जबानी त्यांनी दिली आणि या प्रकरणापासून हात झटकून टाकले. डॉ. समरलिन यांना त्यांच्या जबाबदारीच्या जागेवरून तावडतोब बडतर्फ केले जाईल, असा अनेकांचा कयास होता; परंतु त्यांना तावडतोब सेवानिवृत्तीपूर्वीच्या एक वर्षाच्या रजेवर पाठविण्यात आले. □

# माझ्यातला खराखुरा 'मी' निद्रिस्त आहे....

( अँटोनीन अर्ताड हा एक प्रसिद्ध फ्रेंच नाटककार, टीकाकार, चित्रपट अभिनेता व उत्तम दिग्दर्शक होता. आयुष्याच्या शेवटी त्याला बरीच वर्षे वेड्यांच्या रुग्णालयात ठेवले होते. त्यातून सुटल्यावर दोन वर्षांतच, १९४८ साली त्याचा दु:खद अंत झाला. नवीन व प्रायोगिक रंगभूमीवर त्याच्या नाटकानी वेगळाच ठसा उमटवला. 'दि थिएटर अँन्ड इट्स डबल' हे त्याच्या लेखाचे भाषांतरीत पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. शेवटच्या त्या वेडसर अवस्थेत आपल्या काही मित्रांना त्याने पत्रं लिहिली आहेत. त्यांपैकी डॉ. अॅलेंडीला लिहिलेल्या पत्राचा हा स्वैर अनुवाद.)

प्रिय मित्रा,

पॅरिस, ३० नोव्हेंबर १९२७

सरतेशेवटी ज्या गोष्टीला मी तयार झालो, तो सायको-अॅनालिसिस माझ्या मनावर अविस्मरणीय ठसा उमटवून गेला, हे तुला सांगायचं राहूनच गेलं. आपल्या पहिल्या भेटीत स्वाभाविकपणे मी या प्रकारच्या उपचाराबद्दल अतिशय तिरस्काराने बोललो होतो, हे तुला आठवत असेलच. माझ्या चौकस स्वभावाला आणि सदसद्विवेकबुद्धीला सायको-अॅनालिसिस हा एक प्रकारचा शरीरविक्रय किंवा निर्लज्जपणा वाटत होता. जरी माझ्या बौद्धिक स्तरावर तू बदल घडवू शकला नसलास तरी माझं मन मात्र वळवू शकलास आणि एका विशिष्ट दृष्टिकोनातून पहाता, या प्रयोगामुळं माझ्यावर झालेले चांगले परिणाम मला निश्चितच जाणवले. केवळ म्हणूनच पुन्हा कधीही गरज लागल्यास अशा प्रकारच्या प्रयोगाला मी नक्कीच तयार होईन; परंतु अंतर्मनाच्या खोल पातळीवर मात्र सायको-अॅनालिसिस मी प्रयत्नपूर्वक टाळेन. माझ्या सदसद्विवेकबुद्धीला नियमांच्या चौकटीत बसवण्याचा किंवा एखादे विशिष्ट वळण देण्याचा प्रयत्न मी निश्चितच हाणून पाडीन. तरीसुद्धा, तुझ्या प्रयत्नांमुळे माझ्यात जो बदल घडून आला आहे, त्याचीही मला जाणीव आहे. तथापि, मला आता डॉक्टरी औषधाची अजिबात गरज नसून मी सर्वसामान्य आयुष्य व्यवस्थित जगू शकेन, असा तुझ्यासारख्या माझ्या भोवताली असणाऱ्या माणसांचा जो समज आहे तो मात्र सर्वस्वी चुकीचा आहे. मला औषधाची अजूनही गरज आहे-- आणि खरं म्हणजे त्याहूनही मला तुझ्यासारख्या माणसांची जास्त गरज आहे. तुम्ही माझ्या रोगाचं जे निदान केलं आहे, त्याचा अजूनही फेरविचार व्हावा.

मला याची पूर्ण जाणीव आहे की, मी यशाच्या अत्युच्च शिखरावर पुन्हा जाऊन पोहोचलोय. आयुष्याच्या अशा एका सुरेख टप्प्यावर मी येऊन ठेपलोय की, जिथे नियतीने मुक्त हस्ताने नानाविध गुणविशेषांची माझ्यावर उधळण केली आहे. व्यावहारिक, नैतिक आणि अध्यात्मिकदृष्ट्या मी खरोखरच सुखी आहे, हे बाह्यतः कोणत्याही गोष्टीने सिद्ध करता येईल; परंतु माझ्या मनात कुठे तरी खोल एक गोष्ट मात्र सतत सलत रहाते की, मी निरुपयोगी होत चाललोय. स्वतःशी मी प्रामाणिक नाही. माझ्या आत्म्याशीच मी प्रतारणा करतोय. ही बोचरी जाणीव, मला दैवाने मिळालेल्या सुखाचा उपभोग घेऊ देत नाही. तू मला सोडून जाशील, या भीतीने हे सर्व मी तुला लिहीत आहे. अजूनही मला तुझी फार गरज आहे. मला पूर्वीपेक्षा खूपच समज आली आहे; पण तरीही कुठल्याही एका विषयावर मी माझे मन केंद्रित करू शकत नाही. तुला वाटतं त्यापेक्षा ही गोष्ट खरोखरच जास्त चिंताजनक आहे. मनाच्या या विचारशून्यतेपलीकडची ही मूर्खपणाची जाणीव मला दाबून टाकायची आहे. या असल्या जाणीवेने मला पुरता लंगडा बनवलंय. मी निर्जीव बनलोय! मी निर्जीव बनलोय!! माझ्यातली अंतस्थ प्रेरणाच मरून पडली आहे. ती सोडून गेल्याला आता बरीच वर्षे लोटली आहेत. आज कित्येक वर्षं मला सावरणाऱ्या त्या उदात्त प्रतिभेशिवायच मी जगतोय. त्या दैवी प्रेरणेतच मला माझं स्वत्व गवसलं होतं. त्या स्वयंस्फूर्त प्रतिभेनेच मला उभं केलं होतं. जगण्याची शैली आणि आयुष्याची दिशा मला त्यात प्रत्ययास आली होती. आता मात्र मी जीवनाविषयी पूर्ण उदासीन बनलोय. अजूनही कधीतरी त्या जाणीवांच्या लहरी माझ्या मनात उसळून येतात; पण त्यातलं पूर्वीचं चैतन्य हरवलेलं असतं. त्यांचा दर्जा निश्चितच खालावलेला असतो. खरोखरच केवळ कल्पनेचे किंवा माझ्या मनाचे हे खेळ नाहीत. वस्तुस्थितीच अशी आहे की, मला स्वतःचं अस्तित्वच उरलेलं नाही. माझ्यातला खराखुरा 'मी' निद्रिस्त आहे.

मला पुन्हा जायचंय माझ्या स्वप्निल जगात. माझ्या हरवलेल्या प्रतिमा मी अतिशय सावकाशपणे माझ्या ओंजळीत साठवू पहातोय; पण माझ्या ओंजळीत त्या येतच नाहीत. पूर्वीसारख्या त्या माझ्यावर चालूनही येत नाहीत. अशा परिस्थितीत मी निरुपाय झालोय. माझ्या प्रतिभेची खरी किंमत तिच्या अस्सलपणातच होती. ती आता लोप पावत चालली आहे; परंतु पूर्वी स्वतः केलेले अनेक विचार किंवा माझ्या वाचनात आलेले दुसऱ्याचे जे विचार होते, त्यांचे पडसाद अजूनही माझ्या मनाच्या गाभाऱ्यात उमटत असतात. मला समजून घे. केवळ हा प्रतिमेच्या दर्जाचा किंवा विचारांच्या संख्येचा प्रश्न

नाही. हा प्रश्न आहे सत्यामध्ये, वास्तवामध्ये दडलेल्या प्रचंड सामर्थ्याचा. आता आयुष्य असं उरलेलंच नाही. माझ्या विचारानी प्रेरित होईल किंवा माझ्या विचारप्रवाहाशी जुळून येईल, असं आयुष्य आता माझ्या वाट्याला येणार नाही. लक्षात घे, मी 'आयुष्य' म्हणतोय. आयुष्याच्या एखाद्या बारीक छटेबद्दल मी बोलत नाही. मी त्या मूलभूत प्रेरणेविषयी–ज्या आदिम ठिणगीतून अनेक विचार पेटून उठतात त्या ठिणगीविषयी, गाभ्याविषयी–सबंध आयुष्याबद्दल मी बोलतोय. मला जाणवतय की, या गाभ्या-पाशी मी मरून पडलोय आणि हे सर्व मला सोसायला लागतंय. श्वासागणिक हे मला तीव्रतेनं जाणवतंय. माझे सगळे विचार अपरि-हार्य अशा अनिर्णित अवस्थेतून जात असताना हवेतच विरून जातात. ही अवस्था, ही जाणीव मला बोचतेय, सतत. ह्याचाच रोग जडलाय मला. मला आता विचार करणही जमत नाही. तुला ही पोकळी, ही माझी कधीही न संपणारी विचारशून्य अवस्था समजतेय का? हे माझं अस्तित्व ! समजतंय ? खरोखर किती भयानक आयुष्य मी जगतोय ! पुस्तकांतून वाचलेल्या त्या अशा एका बिंदूशी येऊन पोहोचलोय की, जिथून मी धड पुढंही जाऊ शकत नाही आणि मागेही सरकू शकत नाही. मी रुतत चाललोय. मी त्या पुस्तकांना मागं टाकलंय खरं, पण अजून त्यांना ओलांडू शकलेलो नाही. कारण त्या पुस्तकांना ओलांडायचं म्हणजे मला जगलं पाहिजे आणि जगण्यावर तर माझा मुख्य आक्षेप आहे. –कसं ? ते मी तुला आता-पर्यंत समजावून सांगितलंच आहे. माझे विचार आता स्थल-कालाच्या संदर्भात प्रसरण पावूच शकणार नाहीत, हे मी समजून चुकलोय. मी कोणीच नाही. माझं स्वत्वच हिरावून घेतलंय. कुठल्याही एखाद्या घटनेला अथवा विचाराला मी सामोरा गेलो तरीसुद्धा त्यासंबंधी स्वतंत्र विचार मी करू शकत नाही. माझ्यापाशी निर्मितीक्षम विचार नाहीत. माझा शोध निष्फल आहे. एखादा बौद्धिक तर सोडूनच दे; परंतु साधा भावनिक किंवा काल्पनिक विचारही माझ्या मनात येत नाही. माझी प्रतिभाच मुळी पूर्णपणे संपली आहे आणि ती परतण्याची आता अजिबात शक्यता नाही.

मी माझ्या हरवलेल्या प्रतिभेचा शोधही घ्यायचा प्रयत्न करत नाही. कारण मला माहीत आहे की, मला ती परत कधीच गवसणार नाही. मला याची पूर्ण जाणीव आहे की, आता अशी एकही गोष्ट उरलेली नाही की, जी माझ्या अंतरात्म्यातून उसळून अशा एका कणखर बौद्धिक पातळीशी येऊन पोहोचेल, की जिथे ती माझ्या हरवलेल्या स्वत्वाला जाऊन भिडेल. जोपर्यंत माझ्या हरवलेल्या प्रतिमा, माझ्या वैचारिक दृष्टीतील ती तीव्रता, माझ्या स्वच्छंद विहार करणाऱ्या कल्पनेची ती पातळी मला पुन्हा गवसत नाही तोपर्यंत माझं लिखाण, माझं कार्य हे इतर माणसांना सर्वस्वी अपरि-चित असलेल्या अशा परिस्थितीच्या चुकीच्या कल्पनांतून स्फुरलेलं राहील आणि म्हणूनच ते लोकांच्या विश्वासास पात्र होणार नाही. तो केवळ युक्तिवाद किंवा तात्पुरती तडजोड असेल. मित्रा, खरोखरच ही गोष्ट चिंताजनक आहे. मी अत्यंत वाईट अशा नैतिक सुस्तावस्थेत खितपत पडलोय. मी काहीच लिहीत नाही. कधी तरी लिहितो तो केवळ अपघात असतो; पण जे खरोखर मला सांगायचं असतं, उल-गडून दाखवायचं असतं ते मी लिहूच शकत नाही. माझी लेखणी तिथपर्यंत जाऊच शकत नाही. कधीही जाऊ शकणार नाही. ही गोष्ट चिंताजनक आहे. कारण ती केवळ कल्पनेसाठी कल्पना किंवा एखाद्या मोफतच्या लिखाणाचा तो प्रश्न नाही. हा प्रश्न आहे एका निखळ विचाराचा–पर्यायाने जीवनाचा. आयुष्याच्या सर्व थरांमध्ये हाच पोकळपणा मला जाणवतोय. मला माहीत आहे की, मी प्रत्येकाला त्रास देतोय. मी कोणालाच आवडत नाही; परंतु राहिल्या-वर मी दुसरं आणखी काय करू शकतो ? मरणाशिवाय यावर दुसरा इलाज नाही. खरंच मला मरण येईल ? प्रत्येक गोष्टीला फसवणाऱ्या माझ्या या क्षुद्र आयुष्याची कल्पना तुला आल्यावर आता निदान या सर्व गोष्टीतून मला बाहेर काढण्यासाठी तू काही औषधी उपाय शोधशील का ?

तुझा–तुझाच मित्र
आर्टॉड

( अनुवाद : दीपक भास्कर कुलकर्णी )

---


**SOME NEW TITLES RECIEVED**

1. Experiment with Untruth ( A reliable, authentic book on Emergency ) Michael Henderson — Rs. 40–00
2. Chapter of Life ( Mysticism )– Rampa Lobsang — Rs. 19-95
3. I Believe ( Mysticism ) Rampa Lobsang — Rs 20–80
4. Have Expenses Will Travel (Best-seller–Unusual tips for the Executives)– Davis William — Rs. 23-30
5. New Hope for Arthritic (Medical)– Collin Dong & Jane Bank — Rs. 27–75
6. Understanding Human Sexual Inade quacy (A book on sex recommeded by Masters & Johnson )–Fred Belliveau — Rs. 19–75
7. The Shops of The Fisherman– West Morris — Rs. 26–00

* गाजलेल्या पुस्तकाच्या एकापेक्षा जास्त प्रती.

**The Phoenix Library**
727, Opp. Sadashiv Post, Poona 30.

## हिंदी चित्रपट

# मंथन

## पिचण्याकडून पेटण्याकडे

सदानंद बोरसे

'अंकुर' व 'निशांत' या आपल्या चित्रपटांनंतर श्याम बेनेगल यांनी 'मंथन' हा तिसरा चित्रपट सादर केला आहे. हा चित्रपट प्रायोगिक म्हणून ज्याप्रमाणे अन्य हिंदी चित्रपटांपेक्षा वेगळा आहे, त्याचप्रमाणे आपल्या आर्थिक बाजूच्या दृष्टीनेही एक महत्त्वपूर्ण प्रयोगच ठरणार आहे. या चित्रपटासाठी कोणा एकाच निर्मात्याने भांडवल पुरविले नाही, तर गुजराथमधील पाच लाख शेतकऱ्यांनी घडविलेल्या पाकळीपाकळीने हे फूल उमलले आहे. साहजिकच निर्मात्याची मर्जी, त्यामुळे करावी लागणारी तडजोड या सर्व सबबीना या प्रयोगाने सणसणीत चपराकच बसणार आहे. या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाबद्दल श्याम बेनेगल यांचे अभिनंदन.

श्याम बेनेगल यांनी आपल्या आधीच्या दोन्ही चित्रपटांमधून खेडेगावातील शोषितांच्या जीवनाचे चित्रण केले आहे. या जीवनाचा वेगवेगळा भाग वेगवेगळ्या दृष्टिकोनातून मांडला आहे. 'अंकुर' मध्ये शोषित आणि शोषक हा संघर्ष एकाच स्त्रीपुरता व तिच्यावर अन्याय करणाऱ्या जमीनदारापुरता होता. 'निशांत' मध्ये एका स्त्रीमुळेच हा संघर्ष घडतो आणि त्यात जमीनदार विरुद्ध संपूर्ण गाव अशा फळ्या पडतात. 'मंथन' मध्ये हाच लढा पण आपल्या अधिक नजीकच्या काळात येतो. पिचणारे हरिजन असतात, तर पिचवणारे गावचे सरपंच आणि त्या इलाख्यातील दुधाचा व्यवसाय करणारा एक श्रीमंत गृहस्थ.

डॉ. राव (गिरीश कर्नाड) हा पशुतज्ज्ञ देशमुख (मोहन आगाशे) व चंदावरकर (अनंत नाग) या आपल्या सहकाऱ्यांसह एका खेड्यात सहकारी दूध विक्री योजनेची सुरुवात करतो. त्याच भागात दूधविक्रीचा व्यवसाय करणाऱ्या मिश्राचे (अमरीश पुरी) वर्चस्व तो गावचा सरपंच (कुलभूषण खरबंदा) आणि भोला (नासीरुद्दीन शाह) या दोघांच्या मदतीने मोडून काढतो; पण सहकारी संस्थेच्या निवडणुकीत सरपंच व भोलाचे वितुष्ट येते. डॉ. राव भोलाला सर्वतोपरी मदत करतात. त्याचा परिणाम म्हणून सरपंच व मिश्रा एक होऊन डॉ. रावची गावातून बदली घडवून आणतात, हरिजनवस्तीला आग लावून सहकारी संस्था मोडण्याचा प्रयत्न करतात; पण डॉ. राव गेल्यानंतरही भोला जिद्दीने ही संस्था चालू ठेवण्याचा निश्चय करतो.

ही कथा आहे व्ही. कुरिअन आणि श्याम बेनेगल यांची. शोषक आणि शोषित यांच्यातील झगडा हेच स्वरूप असल्याने कथा बरीचशी प्रचारकी वळणाची बनणे अपरिहार्यच होते. हा परिणाम चित्रपटावरही झाला आहेच. मुख्यत: सहकारी संस्थेची उभारणी, कार्य, निवडणूका, त्यावेळचा प्रचार या साऱ्यांमुळे तर चित्रपटाचा काही भाग एखाद्या डॉक्युमेंटरीसारखाच वाटेल; पण कथा या सूत्रापुरतीच बांधलेली राहात नसल्याने आणि हा संपूर्ण भागही कथेच्या ओघातच बसत असल्याने तो कोठेही खटकत नाही. डॉ. रावचे व्यक्तिचित्रही संपूर्ण कथेतून उलगडत जाते. खास करून बिंदू (स्मिता पाटील) या गावातील हरिजन स्त्रीशी असलेले डॉ. रावचे मानसिक नाते आणि चंदावरकरला डॉ. राव गावातून घालवून देतो तो भाग हा कथेपेक्षाही या व्यक्तिचित्रणालाच अधिक जवळचा आहे. डॉ. राव व बिंदू यांची पहिली डावी-उजवी खटक्यातूनच होते. पुढे बिंदू जसजशी डॉ. रावच्या जवळ येत जाते, तसतशी ती त्याच्या प्रेमात पडत जाते. दोघे विवाहित असूनही दोघांना एकमेकांबद्दल वाटणारे प्रेम, आदर अत्यंत संयमितरित्या दाखविल्याने त्या दोघांच्या नात्याला ऋजुता तर आली आहेच; पण त्याला असलेला वासनेचा पदरही उलगडून दाखविल्याने (डॉ. राव बिंदूचा तोल सावरतो तो प्रसंग वा बिंदू पाय धूत असताना डॉ. राव पाहतो तो प्रसंग) ते प्रेम माणसांचे आणि मातीत पाय रोवलेल्या माणसांचे राहते. शेवटीही डॉ. राव पत्नीबरोबर निघून जातो आणि बिंदूचा नवरा तिला डॉक्टरशी एक शब्दही बोलू देत नाही, हे सगळेच आपल्या मर्यादांची जाणीव करून देणारे आणि म्हणूनच खरेखुरे वाटते. संपूर्ण चित्रपटात बिंदूची भावना व्यक्त करणाऱ्या 'मारे घर, आंगना ना भुलो' या सूत्रगीताचा वेगवेगळ्या प्रसंगी फारच सुरेख उपयोग करून घेतला आहे. तिची भावना याहून वेगळ्या व अचूक शब्दांत पकडणे कठीणच. चंदावरकरला गावातील एका हरिजन मुलीशी लफडे जुळविल्याबद्दल डॉ. राव तडकाफडकी, त्याचे काहीही ऐकून न घेता हाकलून देतो आणि तो विषय आपल्यापुरता संपूर्ण मिटवून टाकतो, हे मात्र खटकते. इतर बाबीमध्ये अत्यंत विचारपूर्वक निर्णय घेणारा डॉ राव रागाच्या तिडिकेच्या क्षणिक प्रतिक्रियेमुळे चंदावरकरला हाकलेल हे मान्य, पण नंतरही तो यावर विचार करणार नाही का? की त्याने नंतर तसा विचार करण्याशी कथेचा संबंध नसल्याने कथेतून तो विषय बाजूला टाकला? की डॉ. रावचा कडक स्वभावच दाखविण्यासाठी फक्त हा प्रसंग घेतला होता?

श्याम बेनेगल यांनी दिग्दर्शक म्हणूनही 'मंथन' निशांत वा अंकुराच्या शैलीत पेश केला आहे, (उदा.– शेवटचा लहान मुलाचा प्रसंग)फक्त 'मंथन' मध्ये डायरेक्ट भाषणबाजी आणि प्रचार जास्त आला आहे. त्यामुळेच कलामूल्यांच्या दृष्टीने मंथन खाली उतरतो. वर उल्लेखलेले डॉ. राव व बिंदूचे नाते व्यक्त करणारे सर्व प्रसंग त्यांनी सुरेख गुंफले आहेतच. संपूर्ण चित्रपटात आढळलेले त्यांच्या दिग्दर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे अत्यंत संयमित हाताळणी. काही दोन-तीन प्रसंग वगळल्यास कोणताही प्रसंग एकदम मनात खुपसला जात नाही, मग ती डॉ. राव व भोलाची भोलाच्या घरी झालेली भेट असो, माहितीपट चालू असताना झालेल्या दगडफेकीचा प्रसंग असो वा डॉ. रावने केलेली भोलाची सुटका असो. पण या संयमित हाताळणीमुळेच चित्रपट प्रचारकी थाटाचा असूनही हळूहळू मनात घुसत जातो. संपूर्ण चित्रपटातच अत्यत मळके रंग वापरून त्यांनी गावाचा रखरखीतपणा, कोरडेपणाही जाणवून दिला आहे. आणखी एका गोष्टीबद्दल त्यांचे अभिनंदन– अनंत नाग, मोहन आगाशे, साधू मेहेर या समर्थ

कलावंतांना तशा छोट्या भूमिका देवून त्यांनी स्मिता पाटील, नासिरुद्दीन शाह या नव्या कलाकारांना भरपूर वाव दिला आहे आणि या कलाकारांनीही त्या भूमिकाचे चीज केले आहे. फक्त एकच तक्रार– चंदावरकर खेड्यात आल्यानंतर शौचाला जाण्यासाठी त्याची होणारी पंचाईत विनोदनिर्मितीसाठी का होईना पण इतकी ताणायला (खरे तर दाखवायलाच) हवी होती का?

गिरीश कर्नाड, स्मिता पाटील आणि नासिरुद्दीन शाह यांनी या चित्रपटातील भूमिकांद्वारे आपल्या डोक्यात एकेक मानाचे पीस खोवले आहे. बाकीच्या कलाकारांनीही आपापल्या भूमिकांमध्ये प्राण ओतलेला आहे. मुख्यतः आधी शहरी डॉक्टरवर भडकलेला, मग हळूहळू डॉक्टरच्या जवळ आल्याने त्याच्याबद्दल आदर व प्रेम निर्माण झालेला आणि अखेरीस डॉक्टर निघून गेल्यावरही 'सहकारी संस्था चालवायचीच' या जिद्दीने पेटलेला हरिजन तरुण भोला नासिरुद्दीन शाहने भन्नाट रंगविला आहे. छोट्या-मोठ्या प्रसंगांतून (डॉ. रावला तो आपल्या जमातीच्या तुडवल्या जाणाऱ्या जीवनाची कल्पना देतानाचा प्रसंग, डॉक्टर त्याची सुटका करून आणतानाचा प्रसंग, मिश्राला भोला धुडकावतो तो प्रसंग, डॉक्टरला निरोप देण्यासाठी तो जिवाच्या कराराने धावत येतो, पण त्याला फक्त दूर जाणारी गाडीच दिसते तो प्रसंग) होणारा भोलाचा भावनोद्रेक त्याने सुरेख पेलला आहे,

चित्रपटात सुरेख जागांत पेरलेले गीत लिहिले आहे प्रीती सागर यांनी व संगीतकार आहेत वनराज भाटिया. या गीताची गायिका प्रीती सागर हिचा गहिरा आवाजही गीताला 'फिट्ट' बसलाय.

कुणी श्याम बेनेगलच्या या तीन चित्रपटांतून साखळी शोधण्याचा प्रयत्न करील, बेनेगलांच्या मनात कदाचित ती असेल, अशी साखळी सापडो वा न सापडो; पिचण्यातून भडकणारी, पेटविणारी आणि तिन्ही चित्रपटांत आढळणारी आच मनाला चटका देऊन जाते, हे मात्र खरे. *

## चला मुरारी हीरो बनने

### झीरोकडून हीरोकडे

लहानपणी प्रत्येकाने सात-आठ वेळा तरी 'मला कोण व्हावेसे वाटते?' या विषयावर निबंध लिहिलेला असतो. मार्कांवर डोळा ठेवणारी हुशार मंडळी निबंधात वयानुसार शिक्षक, डॉक्टर, समाजसेवक असा बदल करतात; पण मराठी निबंधातही खरेखुरे लिहिणाऱ्या बऱ्याच प्रामाणिक महाभागांनी मात्र इंजिन ड्रायव्हर, बस कंडक्टर अशा यादीत एकदा तरी सिनेमाच्या हीरोला जोडलेले असते. 'चला मुरारी हीरो बनने' हा चित्रपट म्हणजे असाच लेखक-दिग्दर्शक-प्रमुख भूमिकाकार असरानीने लिहिलेला 'मला हीरो व्हावेसे वाटते' हा निबंध. असरानीची हीरो होण्याची हौसही या चित्रपटातून भागली आहे.

मुरारी (असरानी) हा दिल्लीच्या एका शिप्याचा तरुण मुलगा. इतर कित्येक तरुणांप्रमाणेच त्यालाही सिनेमाचे जबरदस्त आकर्षण. एक दिवस तो हीरो बनण्यासाठी मुंबईला येतो. त्यासाठी त्याने सोसलेले हाल, हळूहळू त्याला मिळालेली बढती हे सर्व दाखवीत दाखवीत मध्यंतरापर्यंत तो जानामाना मशहूर हीरो अमितकुमार बनतो. दरम्यानच्या काळात मेरी (बिंदिया गोस्वामी) नामक मुलीशी त्याचे जुळतेही. मध्यंतरानंतर मात्र चमच्यांची चालबाजी व गैरसमज यांमुळे मुरारी–मेरीचे फाटणे आणि मग ते जुळवून देण्यासाठी दोघांच्याही उसवलेल्या मनांना हरवलेल्या प्रेमाचे अस्तर लावून दर्दभऱ्या डायलॉगबाजीचे टाके घालणे हा प्रकार इतर हिंदी सिनेमांसारखाच चालतो त्यातून निष्पन्न एकच–फिल्मी नियतकालिकांमधून प्रसिद्ध होणाऱ्या गॉसिपवर विश्वास ठेवू नये. शेवट अर्थातच गोड–मुरारी–मेरी लग्नाचा विजय असो! आंतरधर्मीय विवाह आणि प्रेम वगैरे झिंदाबाद! _तर एक आगळा विषय हातात मिळूनही फिल्मवाल्यांनी शेवटी फिल्मीपणाच केला.

दिग्दर्शक म्हणून असरानीच्या कामगिरीची हीच तऱ्हा. मध्यांतरापर्यंतच्या निरनिराळ्या प्रसंगात त्याची चमक दिसून आली केस्टो मुकर्जी (दिलीपकुमारच्या जागी) आणि लीना चंदावरकर (मीनाकुमारीच्या जागी) यांच्यावर चित्रित केलेले 'दो सितारों का जमीं पर है मिलन' हे गाणे, प्रेमनाथबरोबरचे असरानीचे शूटिंग असले अफलातून प्रसंग तर मी कधीच विसरणार नाही. पण बाकी ठिकाणी अगदीच सरधोपट व अगदीच पारंपरिक मार्ग हाताळले आहेत. उदाहरणार्थ–शेवटी मुरारीच्या हातावर डोळ्यातील अश्रू ठिपकणे, वा अशोककुमारचे सुरवातीचे निवेदन.

प्रमुख भूमिकाकार म्हणून असरानीची कामगिरी उत्तम. फक्त हिंदी चित्रपटाचा प्रस्थापित नायक (ज्याची प्रतिमा चित्रपटात असरानीनेच बनविली आहे) म्हणून तो शोभत नाही. त्याने पेश केलेल्या पृथ्वीराज कपूर, दिलीपकुमार (मुगले आझम), देव आनंद (हम दोनो) यांच्या नकला तर बेहतरीन. चित्रपटातील दिवास्वप्न पाहणारा, नंतर स्टुडिओच्या चकरा, कोरडी सहानुभूती यांनी खचणारा, प्रेमभंगाने हताश होणारा, आशेच्या मधाच्या बोटाने हरखणारा तरुण त्याने सुरेख उभा केला आहे. त्याचे अप्रतीम भावदर्शन आणि विलक्षण बोलके डोळे यांमुळे तो इतर चित्रपटांमध्ये छोट्या भूमिकांतूनही भाव खाऊन जातो, मग आता तर त्याला संपूर्ण चित्रपटच खायला मिळाला आहे. बाकीच्या कलाकारांनीही त्याला सुरेख साथ दिली आहे.

संगीतकार राहुलदेव बर्मन यांची कामगिरी असामान्य नसली, तरी समाधानकारक आहे विशेषतः आशा भोसल्यांचे 'दो पल की है ये जिंदगानी' हे नय्यर स्टाईलचे गाणे सुरेख उतरलेले आहे. □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

उत्तर : आमच्या कोणत्याही महत्त्वपूर्ण योजनेमध्ये कपात करण्यात आलेली नाही. आमच्या अगामी पाच वर्षांच्या योजनांची आखणी काळजीपूर्वक करण्यात येते. या योजनांचा तपशील संरक्षण मंत्रालयाकडे जातो. त्यावरील खर्चाचा विचार करून मग मंजुरी देण्यात येते. यावर्षीच्या कपातीमुळे काही योजना पुढे-मागे कराव्या लागल्या इतकेच. एकंदर पाच वर्षांच्या योजनेसाठी जी रक्कम मंजूर केली आहे त्यामध्ये कपात नसल्याने हाती घेतलेल्या योजनांना प्राधान्य देण्याचे काम काळजीपूर्वक करावे लागते. खर्चाच्या काही बाबीमध्ये कपात करून सैन्याच्या आधुनिकीकरणाच्या दृष्टीने जो खर्च आवश्यक आहे तो आम्ही चालू ठेवला आहे सैन्य व्यवस्थापनामध्ये–'आगामी योजना' ही सतत चालू असणारी गोष्ट असते आणि सुचविलेल्या योजनांची मंजुरी हातात पडल्यावर लगेच–नवीन कार्यक्रमाची आखणी सुरू होते. आमच्या वाढत्या गरजांचा तपशील आम्ही सरकारला पुरेसा आधी कळवितो.

प्रश्न : शस्त्रास्त्राचे स्वदेशी उत्पादन कितपत प्रगत अवस्थेमध्ये आहे ? याबाबतीत आपण पाकिस्तानशी बरोबरी करू शकतो का ?

उत्तर : विकसनशील देशांच्या तुलनेत विचार केला तर याबाबतीत आपली कामगिरी निश्चितच समाधानकारक आहे. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, रणगाडे, बंदुका, इलेक्ट्रिक युद्ध उपकरणे आणि छोटी शस्त्रास्त्रे याबाबतीत आपण जवळ जवळ स्वयंपूर्ण आहोत. रणगाड्यांपैकी अवडी येथे तयार होणारा वैजयंता आता जवळ जवळ संपूर्णपणे आपल्या देशामधील साधनसामग्री वापरून तयार करण्यात येतो. रणांगणावर आणि डोंगरमाथ्यावर ज्या बंदुका व जीप्स वापरण्यात येतात त्यांचे उत्पादनही आता भारतातच होते दारूगोळ्याच्या बाबतीतही आपण जवळ जवळ स्वयंपूर्ण आहोत. छोट्या शस्त्रास्त्रांच्या बाबतीतही हीच अवस्था आहे. काही बाबतीत परदेशी साहाय्य घेतले जाते; परंतु या मर्यादित साहाय्याचीही आणखी दोन ते तीन वर्षांनंतर गरज पडणार नाही. शस्त्रास्त्र निर्मितीच्या बाबतीतील प्राथमिक भाग पूर्ण करून–अधिक प्रगत निर्मितीकडे आपण वाटचाल सुरू केली आहे. अन्य कोणा देशाचे नाव घेऊन तुलना करण्याची गरज मला भासत नाही.

प्रश्न : रशिया आणि अमेरिका यांच्या बरोबरील बदललेल्या संबंधांचा आपल्या संरक्षण गरजांवर काय परिणाम झाला आहे ?

उत्तर : संरक्षण गरजाची पूर्ती करण्याचे काम संरक्षण मंत्रालयाचे आहे, सैन्याचे नाही. आपण विचारलेला प्रश्न राजकीय स्वरूपाचा आहे आणि आम्ही सैनिक राजकारणापासून चार पावले दूरच असतो. एक गोष्ट मात्र सांगता येईल की, आपल्या मित्र राष्ट्रांकडून आपल्याला आपल्या संरक्षण गरजांबाबत नेहमीच साहाय्य मिळत असते.

प्रश्न : आपण अलीकडेच जी रशियाला भेट दिलीत त्याचा नेमका उद्देश काय होता ?

उत्तर : रशियन सेनादल प्रमुखाने मला रशिया भेटीचे आमंत्रण दिले होते आणि ते मी स्वीकारले. मित्र-राष्ट्रांमध्ये अशा स्वरूपाची आमंत्रणे परस्परांना देण्याचा प्रघात असतो.

प्रश्न : भारत काही अन्य मित्र-राष्ट्रांना शस्त्रास्त्रांचा पुरवठा करतो काय ?

उत्तर : शस्त्रास्त्रांचा व्यापार हा काही आपला उद्देश नव्हे. म्हणजे, खास परदेशी विकण्यासाठी म्हणून आपण कोणतीही शस्त्रास्त्रे तयार करीत नाही. आपल्या स्वतःच्या गरजांनाच आपण प्राधान्य देतो. तथापि काही छोट्या शस्त्रास्त्रांच्या बाबतीत आपली गरज पूर्ण झाल्यावर जे जादा उत्पादन होते, त्यांची विक्री काही मित्र-राष्ट्रांना केली जाते. स्वसंरक्षणाच्या दृष्टीने त्यांना समर्थ करणे हाच त्या मागे उद्देश असतो.

प्रश्न : सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा आपण पुरस्कार करता काय ?

उत्तर : सैन्याच्या गरजासाठी थोडे फार प्रशिक्षण असलेले सैनिक आयत्यावेळी सहज उपलब्ध करून देणे हा सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा उद्देश असतो. तथापि आपल्या सैन्यामध्ये पुरेशी भरती सतत होत असल्याने आणि सैन्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ सहज उपलब्ध होत असल्याने सक्तीच्या लष्करी शिक्षणाची आवश्यकता नाही, असे माझे मत आहे. तथापि लष्करी आयुष्याची थोडीशी जाणीव होण्याइतपत शिक्षण तरुणांना मिळणे आवश्यक आहे. आपली आवाढव्य लोकसंख्या विचारात घेता लष्कराशी सर्वसाधारण तरुणांचा प्रत्यक्ष संपर्क येण्याच्या दृष्टीने अशी योजना राबविणे अवघड आहे.

प्रश्न : लष्करभरतीबद्दल तरुणामधील वाढती उदासीनता आणि खाजगी क्षेत्रामधील मोठ्या पगारांच्या नोकऱ्याचे त्यांना वाटणारे आकर्षण याचा लष्कराच्या कार्यक्षमतेवर काही परिणाम झाला आहे काय ?

उत्तर : लष्करभरतीच्या शारीरिक क्षमतेच्या अटी जास्त जाचक करण्यात आल्या आहेत. तथापि चांगल्या तरुणांना सुरक्षित नागरी जीवनाची आणि बड्या पगारांची खाजगी नोकरी जास्त आवडते, हे नाकारता येणार नाही. कित्येक वेळा अन्यत्र कोठे वर्णी लागली नाही म्हणजे आजचे तरुण सैन्याकडे वळतात. असा अनुभव अधिकारी होऊ इच्छिणाऱ्या मंडळीच्या बाबतीतही येतो. याबाबतीत थोडक्यात सांगायचे झाले तर, सैन्याच्या सध्याच्या गरजा पूर्ण होण्याइतके तरुण मिळत असले तरी बुद्धिवंत तरुणांचा जेवढा वाटा सैन्याला मिळायला पाहिजे तेवढा तो मिळत नाही, हे स्पष्ट केलेच पाहिजे.

प्रश्न : सैन्याच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा होणे जरूर आहे असे आपल्याला वाटते काय ?

उत्तर : अलीकडेच म्हणजे १ जानेवारी १९७३ पासून सैन्याला सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. खेरीज सैन्यदलाकडे सरकारचे सारखे लक्ष असून आपल्या ताकदीच्या प्रमाणात सैन्याला सुखी ठेवण्याचे शासनाचे प्रयत्न सतत चालू असतात.

प्रश्न : आपल्या प्रदीर्घ लष्करी कारकीर्दीमधील सर्वोत्तम काळ कोणता ?

उत्तर : एक मामुली अधिकारी म्हणून मी माझ्या लष्करी जीवनाला प्रारंभ केला असला तरी, प्रत्येक टप्प्यावर मी मन लावून काम केल्याने माझ्या कारकीर्दीबद्दल मी समाधानी आहे. हां, आता मागे वळून पाहताना त्या त्या वेळच्या काही उणीवा जाणवतात; पण त्या आता लक्षात येऊन फारसा फरक पडण्यासारखे नाही. आता संपूर्ण लष्कर हे माझे कार्यक्षेत्र असून मी त्याच दृष्टीने काम करतो.

प्रश्न : निवृत्तीनंतर काय करायचे याची काही योजना आहे का ?

उत्तर : नाही बुवा–अजून तरी काही त्याबाबतीत मी फारसा विचार केलेला नाही. □